(मुखपृष्ठावरून - **संपादकीय**)

१९५७ साली जन्मलेले अजय भट्ट हे बडोद्याच्या सयाजीराव विद्यापीठातून पदवी प्राप्त केल्यानंतर उच्च शिक्षणासाठी अमेरिकेला गेले. १९९० साली त्यांनी 'इंटेल'मध्ये प्रवेश केला. संगणकाच्या वापरामध्ये USB ही अशीच एक दैनंदिन वापरात येणारी गोष्ट. याच्या मानकांच्या (USB Standards) निर्मितीचे श्रेय हे अजय भट्ट यांना जाते. त्याकरता २००२ साली त्यांना Achievements in Excellence हा पुरस्कारही मिळाला. त्यांच्याकडे अमेरिकेतील ३१ महत्त्वाची पेटंटस् आहेत.


इंटेलच्या पेंटियम प्रोसेसरची निर्मिती हीसुद्धा भारतीय वंशाच्या विनोद धाम यांनी केली आहे. तसेच इंटेलच्या पहिल्या Flash memory टेक्नॉलॉजीच्या निर्मितीमध्येही त्यांचा सिंहाचा वाटा आहे. १९५० साली जन्म झालेले विनोद धाम हे मूळचे पुण्याचे. पुढे इंटेलचीच प्रतिस्पर्धी कंपनी AMD मध्ये ते दाखल झाले.

दिल्लीचे विनोद खोसला यांचा जन्म १९५५ साली झालेला. वयाच्या १४ व्या वर्षी त्यांनी इंटेल या कंपनीच्या निर्मितीबद्दल माहिती वाचली. यामुळे प्रभावित होऊन तंत्रज्ञानामध्ये विशेष प्रावीण्य मिळविण्याचा निर्णय त्यांनी घेतला आणि दिल्लीच्या आयआयटीमधील शिक्षण पूर्ण करून पुढील शिक्षणाकरता ते अमेरिकेला गेले. आपल्या इतर सहकाऱ्यांबरोबर सन मायक्रोसिस्टिम (Sun Microsystem) ही प्रसिद्ध कंपनी स्थापन केली आणि १९८४ पर्यंत ते तिचे प्रमुख होते. पुढे त्यांनी नवीन उद्योगांना भांडवल पुरविण्याकरता लागणारी (Venture capital) कंपनी स्थापन केली. प्रदूषणमुक्त पर्यावरणनिर्मितीकरता लागणारी यंत्रसामग्री बनविणाऱ्या कंपन्यांना त्यांनी बरेच भांडवल पुरविले आहे. २०१० साली इंग्लंडचे माजी पंतप्रधान टोनी ब्लेअर हे सल्लागार म्हणून त्यांच्या उद्योगावर नियुक्त झाले.

फेसबुकमधील पहिल्या महिला अभियंता पुण्याला जन्म झालेल्या रुची संघवी, मोटोरोलामधील पद्मश्री वॉरियर, अ‍ॅडोब सिस्टिममधील शंतनू नारायण की ज्यांना बराक ओबामा यांनी तंत्रज्ञानाचे सल्लागार म्हणून नेमले, ते तंत्रज्ञानाला वाहिलेल्या पहिल्या ब्लॉगची निर्मिती करणारे ओम मलिक हे सगळे भारतीय वंशाचे संशोधक केवळ कष्ट, चिकाटी आणि निखळ पात्रता या भांडवलावर अमेरिकेतील उद्योगजगतामध्ये महत्त्वाचे स्थान मिळवून आहेत. ही नावे फक्त वानगीदाखल आहेत. वैद्यक, शिक्षण आणि वित्तीय संस्थांमध्येही अनेक भारतीयांनी महत्त्वाची पदे मिळवली आहेत.

१९७० च्या सुमाराला भारतीय डॉक्टर्स आणि आयआयटी, आयआयएमचे अनेक विद्यार्थी पुढील शिक्षणाकरता अमेरिकेमध्ये येऊ लागले. भारतीयांची तत्कालीन जीवनशैली, आर्थिक परिस्थिती, संशोधनाकरता उपलब्ध शिक्षण आणि साधनसामग्री, तसेच रस्ते आणि इतर मूलभूत सुविधांचा त्या वेळी भारतात दुष्काळच होता. भ्रष्टाचार आणि नोकरशाहीच्या मायाजालातूनच मिळाल्या तर या सुविधा उपलब्ध होत होत्या. याउलट, अमेरिकेमध्ये जीवनाकरता आवश्यक असलेल्या कमीतकमी गोष्टी ही मंडळी साधीशी नोकरी करूनही उपलब्ध करून घेऊ शकत होती. नोकरी मिळविण्याकरता त्यांना कोठल्याही प्रकारच्या चिङ्ख्याचपाट्या किंवा आणखी परीक्षांच्या चक्रव्यूहातून न जाता, शुद्ध गुणवत्तेवर त्या लीलया मिळत होत्या. नोकरीमध्येही कार्यकुशलता, कष्ट यांचा आदर तर होताच; पण त्यांना प्रोत्साहनही मिळत होते. कोठलीही हांजी हांजी त्यांना त्याकरता करावी लागत नव्हती. सभ्य सामाजिक जीवनाकरता

(पृष्ठ क्र. ४० वर)



व्ही.पी.एम्.

# दिशा


वर्ष सोळावे / अंक ८ / ऑगस्ट २०१५

**संपादक**
डॉ. विजय बेडेकर

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष २० वे/अंक २ रा)



**कार्यालय/पत्रव्यवहार**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्या मंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
**दूरध्वनी : २५४२ ६२७०**
**www.vpmthane.org**



**मुद्रणस्थळ :**
परफेक्ट प्रिण्टस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
**दूरध्वनी : २५३४ १२९१**
**२५४१ ३५४६**
Email:perfectprints@gmail.com


## अनुक्रमणिका


| | | | |
|---|---|---|---|
| १) | संपादकीय | डॉ. विजय बेडेकर | |
| २) | फेरफटका लंडन शहराचा | डॉ. सुधाकर आगरकर | ३ |
| ३) | स्वदेशवेध-१ अंदमान | श्री. नरेंद्र गोळे | ९ |
| ४) | नर्मदा परिक्रमा (भाग : १८) | श्री. अरविंद ओक | १८ |
| ५) | स्वप्नांना पंख देणारे डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम | प्रा. संतोष लक्ष्मण राणे | २२ |
| ६) | श्रीमान सुंदर वरुणराज | शैलजा बेडेकर | २४ |
| ७) | भारतीय चित्रपटसृष्टीचे चित्रपतीः व्ही. शांताराम | साहा. प्रा. सुभाष गं. शिंदे | २६ |
| ८) | गुरूपौर्णिमा | सौ. साधना कारंडे-जोशी | ३१ |
| ९) | परिसर वार्ता | संकलित | ३३ |



या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून <u>त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही</u>.

# व्ही. पी. एम. दिशाच्या संदर्भात

- ❖ आपण दिशा नियमित वाचा. इतरांनाही वाचायला सांगा.
- ❖ हे व्यासपीठ **अभ्यासपूर्ण लेखांसाठी** आहे.
- ❖ शैक्षणिक संस्थेने असे मासिक चालवावे, याचे हे एकमेव उदाहरण आहे.
- ❖ आपण विचारप्रवृत्त लेख पाठवून दिशाला सहकार्य करू शकता.
- ❖ आपण स्वत: देणगीमूल्य द्या व इतरांना द्यायला सांगा.
- ❖ आपले देणगीमूल्य द्यायचे राहिले नाही ना, कृपया पडताळून पाहा.
- ❖ दिशाच्या संदर्भात देणगीमूल्य, लेख पाठवावयाचे असतील तर कार्यवाह, विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, नौपाडा, ठाणे - ४००६०२ या पत्त्यावर पाठवा. ०२२-२५४२६२७० या क्रमांकावर संपर्क साधा.
- ❖ आपण सार्वजनिक ग्रंथालयाचे संचालक असाल वा असे एखादे ग्रंथालय चालवत असाल, तर आपण सभासद होणे अत्यंत गरजेचे आहे. महाविद्यालये, शाळा यांच्या प्रमुखांनीही आपल्या संस्थेचे देणगीमूल्य पाठवावे.
- ❖ www.vpmthane.org या संकेतस्थळावर दिशाचे जुने अंक आपण पाहू शकता.
- ❖ वार्षिक देणगीमूल्याचा रु. २५०/- चा धनादेश 'विद्या प्रसारक मंडळ A/C दिशा' या नावाने पाठवावा.
- ❖ कृपया वर्गणीदार व्हावे.

- संपादक

# फेरफटका लंडन शहराचा

*ठाण्याच्या प्राच्य विद्या अभ्यास संस्थेच्या वतीने आयोजित केलेल्या शिक्षकांच्या इंग्लंड सहलीतील अनुभव विशद करण्यात आले आहेत - संपादक*

ठाण्याच्या प्राच्य विद्या अभ्यास संस्थेच्या वतीने मागील काही वर्षांपासून भारतीय शिक्षकांची इंग्लंड सहल आयोजित करण्यात येते. ही शैक्षणिक सहल असून तेथील शालेय आणि महाविद्यालयीन शिक्षण जवळून पाहण्याची संधी शिक्षकांना देण्यात येते. साधारणपणे आठवडाभर हे काम चालते. सहलीच्या शेवटी लंडन शहर दाखविण्यात येते. लंडन शहर हे एक बहुरंगी आणि बहुढंगी शहर आहे. आर्थिक व्यवहाराचे माहेरघर असे या शहराचे वर्णन केले जाते. याखेरीज या शहरात अनेक शैक्षणिक संस्था आहेत. १०० हून अधिक संग्रहालये आहेत. अनेक बागबगिचे आहेत. याहीपेक्षा महत्त्वाचे म्हणजे ग्रीनिच भूमध्यरेखा, बकिंगहॅम राजवाडा, ट्रॅफल्गार चौक, वेस्टमिन्स्टर राजवाडा अशी अनेक प्रेक्षणीय स्थळे आहेत. या सर्व ठिकाणांना भेटी द्यायच्या म्हणजे आणखी एक आठवडा लागेल. आम्हांला मात्र लंडनची सहल ३ दिवसांत संपवायची असते. यांतील एक दिवस आम्ही भारतीय स्वातंत्र्यवीरांशी संबंधीत ठिकाणांना भेट देण्यासाठी वापरतो. या सहलीवर वेगळा लेख लिहिलेला आहे. तसेच ग्रीनिच भूमध्यरेषेला दिलेल्या भेटीवरदेखील स्वतंत्र लेख लिहिलेला आहे. या लेखात शहरातील महत्त्वाच्या ठिकाणांना जी धावती भेट आम्ही दिली तिचे अनुभव विशद करण्यात आलेले आहेत.

लंडनच्या पूर्व भागात न्यूहॅम नावाचे उपनगर आहे. तेथील एका हॉटेलात आमची राहण्याची व्यवस्था करण्यात आली होती. हॉटेलपासून जवळचे भुयारी रेल्वे स्टेशन (बार्किंग) जरा दूरच आहे. तिथपर्यंत जवळच्या मार्गाने आम्ही चालत गेलो. नोव्हेंबरचा महिना होता. थंडीची सुरूवात झालेली होती. त्यामुळे सर्वांनी उबदार कपडे घातले होते. त्याचबरोबर कधी पाऊस येईल याचा नेम नसल्याने सर्वांनी छत्र्या सोबत घेतल्या होत्या. साधारणपणे २०-२५ मिनिटे पायी चालल्यावर आम्ही स्टेशनवर पोहोचलो. तेथे दिवसभराच्या प्रवासाचे तिकीट घेऊन आम्ही लंडन अंडरग्राउंडच्या गाडीत चढलो. रेल्वेचे नाव लंडन अंडरग्राउंड असे असले तरी ती सगळीकडे जमिनीखाली नाही. फक्त लंडनच्या मध्यभागात ती जमिनीखाली आहे. इतर ठिकाणी मात्र ती जमिनीवरच आहे. बार्किंग स्टेशनवर ती जमिनीवरच होती. काही स्टेशन्स पार झाल्यानंतर मात्र ती जमिनीखाली गेली. आजच्या प्रवासातला आमच्या पहिला पडाव होता वेस्टमिन्स्टर पॅलेस म्हणजे इंग्लंडची संसद. म्हणून आम्ही वेस्टमिन्स्टर या भुयारी स्टेशनवर उतरलो. स्टेशनातून बाहेर पडण्यासाठी अनेक मार्ग आहेत. त्यांतील कोणता मार्ग पॅलेसकडे जातो याची माहिती मिळवून आम्ही बाहेर आलो.

वेस्टमिन्स्टर स्टेशनाच्या बाहेर पडताच गुलाबी रंगाची एक भव्य आणि आकर्षक इमारत आमच्या नजरेस पडली. थेम्स नदीच्या किनाऱ्यावर वसलेली ही इमारत गुलाबी रंगाच्या दगडांनी बांधलेली आहे. दगडांची रचना इतकी कलात्मक रितीने केलेली आहे की इमारत एकदम नजरेत भरते. आम्ही इमारतीकडे बघतोच आहोत तेवढ्यात कोणीतरी ओरडले, ''ती बघा बिग बेन.'' त्याबरोबर आम्हा सगळयांच्या नजरा त्या भव्य घड्याळाकडे वळल्या. इमारतीच्या एका टोकाला एक उंच मनोरा बांधलेला आहे. त्या मनोऱ्यावर चारही बाजूने दिसेल असे घड्याळ बसवलेले आहे. या घड्याळाला

प्रत्येकावर विश्वास ठेवणे हे धोकादायक आणि कुणावरही विश्वास न ठेवणे,
हे खूपच धोकादायक होय. - अब्राहम लिंकन

आठवड्यातून एकदा चावी दिली जाते. प्रत्येक तासाला टोले पडतात. त्या आवाजाने संपूर्ण परिसर दुमदुमून जातो. या घड्याळाविषयी शाळेत शिकल्याचे आठवते. पण आज हे घड्याळ आम्ही अगदी जवळून पाहत होतो. आणखी जवळून पाहता यावे यासाठी आम्ही थेम्स नदीच्या पुलावर गेलो. तेथे तर फोटोसेशनच सुरू झाले. जो तो बिगबेनच्या पार्श्वभूमीवर आपला फोटो काढून घेऊ लागला.



बिग बेनचे नावीन्य संपताच सर्व शिक्षक इकडेतिकडे पाहू लागले. त्यांची नजर स्थिरावली ती एका मोठ्या आकाशपाळण्यावर. हिथ्रो विमानतळावर विमान उतरण्यापूर्वी आमच्यापैकी काही जणांनी हा पाळणा वरून पाहिलेला होता. आता मात्र ते जवळून पाहत होते. या मोठ्या आकाशपाळण्याला नाव दिलेले आहे, लंडनचा डोळा (London's Eye). नवीन शकाचे स्वागत करण्यासाठी इ.स. २००१ च्या जानेवारीत हा पाळणा उभारण्यात आला. या कामी इंग्लंडची विमान कंपनी ब्रिटिश एअरवेज (British Airways) ने पुढाकार घेतला. आपल्याकडे जत्रेत असतो तसाच हा आकाशपाळणा आहे. फक्त तो अतिभव्य आहे आणि अतिशय सावकाशपणे फिरतो. या पाळण्याला एक चक्कर पूर्ण करायला जवळजवळ एक तास लागतो. यात बसल्यानंतर संपूर्ण लंडन शहराचे दर्शन होते. हा पाळणा सावकाशपणे फिरतच राहतो, तो थांबत नाही. तो गतिमान असतानाच लोकांनी पाळण्यात बसायचे आणि उतरायचे असते. पाळण्यात बसण्यासाठी प्रत्येक व्यक्तीला १२ पौंड म्हणजे सुमारे एक हजार रुपये एवढे शुल्क द्यावे लागते. बऱ्याच शिक्षकांनी पाळण्यात बसण्याची इच्छा व्यक्त केली. परंतु दिवसाचा उरलेला सर्व वेळ त्यातच जाईल म्हणून ते टाळण्यात आले. काही उत्साही शिक्षक दुसऱ्या दिवशी सकाळीच जाऊन आपली हौस पूर्ण करून आले.



वेस्टमिन्स्टर पॅलेस पाहून झाल्यावर आम्ही बकिंगहॅम पॅलेसकडे कूच केले. मध्ये वेस्टमिन्स्टर ॲबे नावाची स्मशानभूमी दिसते. तेथे इंग्लंडमधील काही महत्त्वाच्या व्यक्तींना मरणानंतर पुरलेले आहे. आम्ही न्यूटनच्या थडग्याचे दर्शन घेऊन लगेच बाहेर पडलो आणि बकिंगहॅम पॅलेसच्या दिशेने चालू लागलो. बागेच्या किनाऱ्यावरून ही वाट जाते. वाटेवर झाडांची पाने पडलेली होती आणि झाडांवर तुरळक पाने दिसत होती. जी होती ती पिवळी झालेली होती. इंग्लंडमध्ये हिवाळ्यात सर्व पाने गळून जातात. वसंतऋतूत नवीन पालवी येऊ लागते. तोपर्यंत आपण दुष्काळी परिसरात फिरतो आहोत असा भास होतो. अशी स्थिती यायला अजून अवधी होता; परंतु पानझड सुरू झाल्याचे दिसत होते. आजूबाजूचे दृश्य बघत आणि गप्पा मारत आम्ही बकिंगहॅम पॅलेसला कधी पोहोचलो हेच आमच्या लक्षात आले नाही. पुढे पाहतो ते भव्य महाल

प्रत्येक जण जग कसे बदलेल याचा विचार करत असतो. मात्र कुणीही स्वतःला कसे बदलता येईल याचा विचार करत नाही. - लिओ टॉलस्टॉय

आणि त्यापुढची मोकळी जागा. महालाच्या दारापुढे अनेक पर्यटकांची गर्दी झालेली होती. सर्व जण दारातून आत बघत होते. काहीतरी महत्त्वाचे घडणार आहे याची कल्पना आम्हांला त्यांच्या वागण्यावरून आली. आम्हीदेखील गर्दीत सामील होऊन महालाच्या दिशेने पाहू लागलो.



बकिंगहॅमच्या ड्यूकने बांधलेला राजवाडा म्हणून या महालाला बकिंगहॅम राजवाडा (Buckingham Palace) असे नाव पडले. हा राजवाडा बकिंगहॅमच्या ड्यूककडून ब्रिटिश सरकारने विकत घेतला. सध्या या महालात इंग्लंडच्या राणीचे वास्तव्य आहे. म्हणूनच या महालाला महत्त्व प्राप्त झाले आहे. या महालाच्या आत गणवेश घातलेले आणि जरीची टोपी घातलेले पहारेकरी सदा पहारा देत असतात. पहारेकऱ्यांचा एक गट जेव्हा आपली जबाबदारी दुसऱ्या गटाला देतो तेव्हाचे दृश्य पाहण्यासाखे असते. त्याला पहारेकऱ्यांचा बदल (Change of Gard's) असे म्हणतात. तेथे उपस्थित असलेले सर्व पर्यटक याच क्षणाची आतुरतेने वाट पाहत होते. आम्हांला फार वेळ वाट पाहावी लागली नाही. टपटप आवाज करीत आमच्या मागच्या बाजूने नवीन पहारेकऱ्यांची तुकडी आली. तिने दारातून आत प्रवेश केला. त्याबरोबर तेथील पहारेकऱ्यांनी आपल्या बंदुका त्यांच्या हाती सुपूर्द केल्या. काम साधेच, पण ते फार शिस्तीत चालले होते. बँडचा आवाज सोबतीला होताच. त्यामुळे ते दृश्य डोळ्यात भरून ठेवावे असेच होते. अनेकांनी या घटनेचे फोटो काढून घेतले.



बकिंगहॅम पॅलेसच्या उजव्या बाजूला एक रुंद रस्ता जातो तो ट्रॅफल्गार चौक (Trafalgar Square) या प्रेक्षणीय स्थळाकडे. रस्त्याच्या दुतर्फा नक्षीकाम केलेले विजेचे खांब लावलेले आहेत. त्याचबरोबर ब्रिटनचे ध्वज लावलेले आहेत. त्या वाटेने आम्ही चालू लागलो. साधारणपणे १०-१५ मिनिटे चालल्यावर आम्ही एका भव्य प्रवेशद्वाराजवळ आलो. प्रवेशद्वारातून आत जाताच प्रसिद्ध ट्रॅफल्गार चौकाचे दर्शन झाले. त्या चौकात असलेल्या उंच पुतळ्याने आमचे लक्ष वेधून घेतले. एवढा उंच पुतळा कुणाचा बरे असेल असा प्रश्न साहजिकच सर्व शिक्षकांच्या मनात आला. काही जणांनी तो ताबडतोब विचारलादेखील. हा उंच पुतळा इंग्लंडच्या सेनापतीचा आहे हे कळल्यावर तर त्यांना आश्चर्यच वाटले. ज्या अर्थी सेनापतीचा एवढा उंच पुतळा उभारलेला आहे त्या अर्थी त्याची कामगिरीही त्याच तोडीची असावी असेच शिक्षकांना वाटले. त्यांचा अंदाज बरोबर होता. तो पुतळा होता नेल्सन नावाच्या सेनापतीचा. १८०५ मध्ये नेपोलियनने इंग्लंडवर स्वारी केली. नेल्सन आणि नेपोलियन या दोघांमध्ये या ठिकाणी तुंबळ युद्ध झाले. त्या युद्धात नेपोलियनचा पराभव झाला. त्यामुळे त्याला काढता पाय

इतरांपेक्षा स्वतःला जास्त ओळखा, इतरांपेक्षा जास्त काम करा आणि इतरांपेक्षा कमी अपेक्षा करा, या तीन गोष्टी यश मिळविण्यासाठी महत्त्वाच्या आहेत. - विल्यम शेक्स्पीअर

घ्यावा लागला. नेपोलियनचा पराभव करणारा पराक्रमी सेनापती म्हणून नेल्सनचे नाव झाले. त्याच्या स्मरणार्थ ज्या ठिकाणी युद्ध झाले त्या ठिकाणीच त्याचा उंच असा पुतळा उभारण्यात आला. नेल्सनच्या पुतळ्याखेरीज ट्रॅफल्गार चौकात पाहण्यासारख्या अनेक गोष्टी आहेत. एकतर सिंहाचे मोठमोठे पुतळे, कारंजे यांखेरीज जवळच असलेले राष्ट्रीय कला संग्रहालय. या संग्रहालयात अनेक दुर्मीळ चित्रांचा संग्रह आहे. आमच्याकडे वेळ कमी असल्याने आम्हांला या संग्रहालयात फार वेळ खर्च करता आला नाही. कारण आम्हांला जायचे होते मॅडम तुसाड (Madame Tussads) या प्रसिद्ध संग्रहालयात. त्यासाठी आम्ही जवळच्याच भुयारी स्टेशनकडे कूच केले. गाडी पकडून आम्ही मॅडम तुसाडकडे रवाना झालो.



मॅडम तुसाड हे संग्रहालय जरा वेगळ्या प्रकारचे आहे. येथे मेणाचे पुतळे आहेत. सुप्रसिद्ध आणि कुप्रसिद्ध अशा दोन्ही प्रकारच्या व्यक्तींचे पुतळे आपल्याला येथे पाहायला मिळतात. पुतळ्यांचा आकार आणि रंग इतके बेमालूमपणे दिलेले आहेत की हा कुणाचा पुतळा आहे याची माहिती द्यायची गरजच पडत नाही. पुतळ्यांची रचनादेखील पद्धतशीर केलेली आहे. पुतळ्यांना स्पर्श करण्याची आणि पुतळ्याबरोबर फोटो काढून घेण्याची मुभा आहे. त्यामुळे अनेकांचे कॅमेरे सरसावले. ह्या पुतळ्यांमध्ये आम्हांला दोन पुतळे लगेच लक्षात आले. त्यांपैकी एक होता अमिताभ बच्चनचा आणि दुसरा होता ऐश्वर्या रायचा. भारतीय सिनेसृष्टीचे प्रतिनिधी म्हणून यांचे पुतळे तेथे ठेवले होते. या पुतळ्यांशेजारीच काही मुली आणि मुले हिंदी चित्रपटातील गाण्यावर नृत्य करीत होती.

इमारतीच्या आत इंग्लंडचा इतिहास दाखविणारे प्रदर्शन आहे. हे प्रदर्शन पाहण्यासाठी एका छोट्याशा गाडीत बसावे लागते. ही गाडी जसजशी हळूहळू पुढे सरकत जाते तसतशी जुन्या काळातील दृश्ये आपल्या नजरेस पडतात. जुन्या काळात शेती कशी केली जायची, दळणवळणाची साधने काय होती, जनजीवन कसे होते, घरे कशी होती, कपडे कोणत्या प्रकारचे होते याची माहिती आपल्याला मिळते. इमारतीच्या आत एक छोटेखानी तारांगण आहे. येथे बसून अंधाऱ्या रात्रीचे आकाश पाहायला मिळते. आकाशात सतत ढग असल्याने बाहेर असे चांदणे क्वचितच पाहायला मिळते. म्हणून तारांगणाचा आस्वाद आम्ही घेतला. त्याचबरोबर जुन्या काळी गुन्हेगारांना शिक्षा कशा करीत असत याचेदेखील प्रदर्शन आम्ही पाहिले. हे सगळे होईपर्यंत संध्याकाळ झाली. चालून चालून पाय दुखायला आले होते. म्हणून आम्ही हॉटेलकडे जाण्याचा निर्णय घेतला. जवळच असलेल्या भुयारी स्टेशनवर जाऊन बार्किंगकडे जाणारी गाडी आम्ही पकडली. अशा रितीने लंडनचा त्या दिवशीचा फेरफटका संपला.

दुसऱ्या दिवशी पुन्हा नवीन जोमाने आम्ही हॉटेलच्या बाहेर पडलो. बार्किंग स्टेशनवर गाडी पकडून प्रवासाला सुरुवात केली. गाडी बदलून आम्ही टॉवरहिल नावाच्या भुयारी रेल्वेस्थानकावर उतरलो. स्टेशनच्या बाहेर येताच आम्हाला एक चबुतरा दिसला. या चबुतऱ्यावर वर्तुळाकार रचनेत इंग्लंडचा इतिहास लिहिलेला आहे. त्यात अनेक महत्त्वाच्या गोष्टींचा उल्लेख आढळतो. या चबुतऱ्यावरून पुढे पाहावे तर एक महाल दिसतो. बारीक बारीक दगडांनी बांधलेला हा महाल काही वेगळाच वाटतो. त्याकडे लक्ष जाताच हे काय आहे, असा प्रश्न शिक्षकांनी केला. टॉवर ऑफ लंडन असे त्या महालाचे नाव आहे. जुन्या

---

जिंकणे म्हणजे नेहमी फक्त पहिले येणे असे नसते. एखादी गोष्ट पूर्वीपेक्षा जास्त चांगली करणे म्हणजेच जिंकणे होय. - विल्यम शेक्सपीअर

काळातील राजाचा तो महालच होता. आता मात्र तेथे वस्तुसंग्रहालय आहे. प्रसिद्ध हिऱ्यांचे प्रदर्शन येथेच पाहायला मिळते. भारतातून आणलेला कोहिनूर हिरा येथेच ठेवलेला आहे. शिक्षकांना जेव्हा याची माहिती देण्यात आली तेव्हा आत जाण्याची त्यांना घाईच झाली. त्याआधी टॉवर ब्रिज दाखविण्याचा आमचा मानस होता; परंतु शिक्षकांच्या उत्साहावर विरजण पडू नये म्हणून आम्ही बेत बदलला, प्रवेशतिकिटे घेतली आणि आत प्रवेश केला.



टॉवर ब्रिजबद्दल शिक्षकांनी बरेच ऐकले होते. त्याचे दुरून दर्शन घेऊन शिक्षकांचे मन भरले नाही. अनेकांनी ब्रिजवर जाण्याची इच्छा प्रदर्शित केली. त्यानुसार आम्ही सर्व जण पुलावर गेलो. थेम्स नदीवर बांधलेल्या अनेक पुलांमध्ये टॉवर ब्रिज हा एक पूल आहे; पण या पुलाचे वैशिष्ट्य असे की जर एखादे जहाज जायचे असेल तर त्याचे दोन भाग वेगळे होतात. आता नदीतून फारशी जहाजे जात नाहीत. तरीही दोन भाग वेगळे करणारी यंत्रणा कार्यरत आहे. पुलावर गेल्यावर आपल्याला ती पाहायला मिळते. संपूर्ण पूल दगड आणि लोखंडाने बांधलेला असून त्याचा आकार अगडबंब आहे. पुलामध्येच त्याची माहिती देणारे प्रदर्शन भरवलेले आहे. टॉवर ब्रिजचे जवळून दर्शन घेऊन झाल्यावर आम्ही सर्व जण खाली उतरलो. त्यानंतर आम्हांला जायचे होते ब्रिटिश लायब्ररीत. त्यासाठी सेंट पँक्रास स्टेशनवर जायचे होते. म्हणून आम्ही टॉवरहिल स्टेशनच्या दिशेने चालू लागलो. परंतु मध्येच नदीतून बोट चालविणाऱ्या माणसाने आम्हांला हटकले. भुयारी रेल्वेचे तिकीट असेल तर सवलतीच्या दरात आम्ही तुम्हांला बोटीने नेऊ असे आमिष त्याने दाखविले. म्हणून आम्ही बोटीने वेस्टमिन्स्टरपर्यंत जाण्याचे ठरविले. थेम्स नदीतून जाणाऱ्या बोटीचा प्रवास खूपच आनंददायक होता. नदीचे पात्र रुंद असून नदीच्या दुतर्फा उंच उंच इमारती आहेत. नदीवर किती पूल आहेत याची गणतीच नाही. लवकरच आम्ही वेस्टमिन्स्टर पिअरजवळ पोहोचलो. काल आम्ही वेस्टमिन्स्टर पॅलेस दुसऱ्या बाजूने पाहिला होता. आज तो नदीतून पाहता आला. तसेच लंडन आयचेदेखील नदीतून आम्हांला दर्शन घेता आले. वेस्टमिन्स्टर पिअरवर उतरून आम्ही वेस्टमिन्स्टर स्टेशनवर आलो. त्यानंतर भुयारी रेल्वेने सेंट पँक्रासला गेलो. तेथून चालत चालत आम्ही ब्रिटिश वाचनालयाजवळ पोहोचलो.



जवळ जाताच वाचनालयाची लाल रंगाची इमारत नजरेत भरते. बाहेरच्या पटांगणात न्यूटनचा धातूचा पुतळा आहे. वाचनालयात प्रवेश करताच डाव्या बाजूला प्रदर्शन भरल्याचे समजले. तेथे जाऊन पाहतो तर लेखन आणि छपाई तंत्राचा विकास कसा झाला याचे प्रदर्शन असल्याचे लक्षात आले. ते पाहून वरच्या मजल्यावर जावे तर अनेक दुर्मीळ ग्रंथांचा संग्रह आपल्याला आढळतो. विशेष म्हणजे त्यात अनेक संस्कृत ग्रंथ असल्याचे आमच्या लक्षात आले. प्रदर्शनातून बाहेर पडतो तोच पोस्टाच्या तिकिटांचा संग्रह

कधी कधी अपमान सहन केल्याने कमीपणा येत नाही; उलट आपले सामर्थ्य वाढते.

आपल्या नजरेत भरतो. तो पाहून पुढे आले तर एका प्रसिद्ध लेखकाच्या लेखनकार्यावर प्रदर्शन भरवलेले आढळले. या वाचनालयात अनेक पुस्तके आहेत. आपण मागणी केल्यास ते पुस्तक काढून देण्यात येते. त्यासाठी एकतर तुम्हांला या वाचनालयाचे सभासदत्व घ्यावे लागते किंवा विद्यापीठाकडून विनंतिपत्र आणावे लागते. वाचनालयाच्या भव्यतेचे कौतुक करतच आम्ही बाहेर पडलो.

त्या दिवशी शेवटचे भेटीचे ठिकाण होते ब्रिटिश वस्तुसंग्रहालय (British Museum). हे संग्रहालय फारच भव्य असून त्यात अनेक विभाग आहेत. संपूर्ण संग्रहालय पाहायचे असेल तर एक आठवडा लागेल. आमच्याकडे एवढा वेळ नव्हता. म्हणून संग्रहालयाच्या रचनेची जुजबी माहिती घेऊन आम्ही शिक्षकांना सांगितले की आपल्याला आवडेल त्या विभागात जा. त्यानुसार काही शिक्षक आशिया विभागात गेले, काही इजिप्त विभागात गेले, काही युरोप विभागात तर काही अमेरिकन विभागात गेले. प्रत्येक विभागात एवढा संग्रह आहे की काय पाहू आणि काय नाही असे त्यांना झाले. एकेक विभाग पाहून ते परतले. तोपर्यंत अंधार झाला होता. सूर्याचे दिवसभर दर्शनच झाले नव्हते. त्यामुळे तो मावळला असे म्हणता येत नव्हते. परंतु सर्वत्र अंधाराचे साम्राज्य पसरले होते. अशा वेळी आम्हांला आमच्या हॉटेलकडे परत जाणे भाग होते. सर्व जण खूप थकलेले होते. तरीही आपण काहीतरी नवीन पाहिले याचा आनंद त्यांच्या चेहऱ्यावर दिसत होता.



राजवाड्याची माहिती देण्यासाठी मार्गदर्शक नेमले आहेत. साधारणपणे २०-२५ पर्यटक जमा झाले की तो गट घेऊन एक मार्गदर्शक माहिती देऊ लागतो. राजा चार्ल्सने हा राजवाडा बांधला. यापासून ते येथे किती आणि कोणाचे खून पाडण्यात आले, दोन राण्यांमध्ये कसे वितुष्ट होते, एकाने दुसऱ्याचा काटा कसा काढला याची इत्थंभूत माहिती ते आपल्याला देतात. हे ऐकून एक शिक्षक म्हणाले, ''हा राजवाडा आहे की कत्तलखाना'' मार्गदर्शकाने दिलेली माहिती ऐकत आम्ही शेवटी हिऱ्यांच्या प्रदर्शनापाशी आलो. तेथे फोटो घेऊ नये ही पाटी पाहून आम्ही सर्व जण हिरमुसलो. पण इलाज नव्हता. एकेक हिरा बघत आम्ही कोहिनूर हिऱ्यापाशी पोहोचलो. जेथे कोहिनूर हिरा ठेवलेला आहे तेथे सरकता पट्टा आहे. या पट्ट्यावर आपण उभे राहायचे की, तो पुढे पुढे जात राहतो.

राजमुकुटामध्ये हा हिरा मढविलेला आहे. आपल्याला तो जास्त वेळ पाहता येत नाही. कारण तोपर्यंत पट्टा पुढे सरकतो. आपल्याला पुन्हा पाहायचे असेल तर मागे जाऊन परत सरकत्या पट्ट्यावर उभे राहायचे. आमच्या शिक्षकांनी असे बरेचदा केले. सरतेशेवटी आम्ही सर्व हिऱ्यांच्या प्रदर्शनातून बाहेर पडलो. त्यानंतर आम्ही प्रवेश केला तो शस्त्रांच्या प्रदर्शनात. येथे अनेक प्रकारची शस्त्रास्त्रे ठेवलेली होती. ते पाहण्यात शिक्षकांना फारसा रस नव्हता. त्यामुळे लवकरच आम्ही राजवाड्याच्या बाहेर पडलो.

आम्ही राजवाड्याच्या बाहेर पडतो न पडतो तोच आमच्या नजरेस पडला टॉवर ब्रिज.


**डॉ. सुधाकर आगरकर**
सी-१४, विसावा, वैभवनगरी,
कल्याण-शीळ रोड,
काटई, ता. कल्याण,
जि. ठाणे - ४२१२०४

●●●

# स्वदेशवेध-१ अंदमान

*अंदमान येथील स्थळदर्शनाचे वर्णन या लेखात केले आहे - संपादक*

अंदमान द्वीपसमूह भारताचे अविभाज्य अंग आहे. ही आपल्याकरता खरेच आनंदाची गोष्ट आहे. हिंदी महासागरास मिळालेले हिंदी हे नामाभिधानही कदाचित, ह्याच आपल्या अस्तित्वाचे द्योतक असावे. मात्र महासागरातील त्याच्या स्थानामुळे अंदमान आणि निकोबार राज्यात वर्षाचे बहुतांशी दिवस हवामान ढगाळ, वादळी आणि पावसाळी राहते. धूसर राहते. तापमान जरी मुंबईसारखेच वाटत असले तरी, हवामानातील महासमुद्री बेभरवसा तिथे पुरेपूर भरून राहिलेला आहे. वर्षातले काही दिवसच तिथे वातावरण समेवर येते. निरभ्र वातावरण, स्वच्छ सूर्यप्रकाश आणि स्थिरपद, स्वस्थ समुद्र; स्वर्गसदृश हवामान प्रदान करतो. हेच दिवस तिथे पर्यटनास अत्यंत योग्य असतात. अशा दिवसांत ज्यांनी तिथे पर्यटन केले, ते त्याची अविस्मरणीय गोडी विसरूच शकत नाहीत. म्हणूनच अंदमानात पर्यटनास जाताना हवामान पक्षकर असायला हवे ह्यात तिळमात्र संशय नाही. एरव्ही, पर्यटनाचे अनेक दिवस खराब हवामानामुळे गमवावे लागलेले पर्यटक तिथे काही कमी नाहीत !




संदर्भ : http://www.andaman.climatemps.com/ वरील तक्ता स्वतःहूनच सारी हवामान परिस्थिती स्पष्ट करतो.

ओले दिवस पर्यटनास योग्य समजायचे नसतील, तर फेब्रुवारीअखेर व मार्च महिन्याची सुरुवात हाच मुहूर्त सर्वोत्तम समजायला हवा. ह्याच दिवसांत नितळ, उबदार सूर्यप्रकाश आणि कमालीची दृश्यमानताही साथ देत असते. आम्हांलाही ह्याच सुवर्णदिवसांत अंदमानात जाण्याची संधी मिळाली हे आमचे सुदैव!

६ रात्री आणि ७ दिवसांच्या; २५ फेब्रुवारी २०१५ रोजी मुंबईत सुरू होऊन, ३ मार्च २०१५ रोजी मुंबईतच संपणाऱ्या सहलीकरता आम्ही नावे नोंदवली. सकाळी पावणेसहाच्या विमानाने निघून, चेन्नईमार्गे सकाळी साडेदहा वाजता आम्ही पोर्ट ब्लेअरला पोहोचलो. फिनिक्स धक्क्यावरूनच हॅवलॉक बेटाकरता बोटी सुटतात. नॉर्थ बे आणि रॉस बेटांकरता मात्र अबर्दिन धक्क्यावरून बोटी सुटतात. सुग्रास जेवण झाल्यानंतर दुपारी कॉर्बिन कोव्ह बीचला गेलो. तर संध्याकाळी सेल्युलर जेलमधल्या लाइट अँड साउंड १८.०० च्या शोला. हा शो हिंदीत असतो. ह्यानंतरचा १९.३० वाजताचा शो इंग्रजीत असतो. ह्याचे दर माणशी तिकीट ५० रुपये आहे. कॉर्बिन कोव्ह बीच, बेटाच्या महासागराकडील दिशेला आहे. तिथे आम्ही शहाळ्याचे पाणी प्यायलो. शंखशिंपले गोळा केली. फोटो काढले. महत्त्वाचे म्हणजे माणशी ३०० रुपये दराने चौघे जण स्पीडबोटीतून चक्कर मारून आलो.

कॉर्बिन कोव्ह बीचवरून, खुल्या महासागरातील भूशिरावरच्या बेटाकडे आम्ही स्पीडबोटीने निघालो खरे,

आयुष्यात तुम्ही किती आनंदी आहात ते महत्त्वाचे नाही. तुमच्यामुळे किती जण आनंदी आहेत याला महत्त्व आहे.

मात्र नावाड्याने आमची वेव्ह रायडर नावाची बोट समुद्री लाटांवर अशी काही चढवली की, आपटाआपटीने आमची हाडे खिळखिळी झाली. कधी टोपी उडून गेली, तर कधी कॅमेरा हातातून निसटला! असे वाटत होते की बोट खालच्या दगडांवर आदळते आहे. फुटते की काय, असेही वाटून गेले. थोडे हळू चालव सांगायला तोल सावरायच्या आत, आम्ही बेटानजीक पोहोचलोही होतो. खुल्या सागरात असल्याने, बेटावर उतरायला मात्र मनाई आहे!





संध्याकाळ फारच लवकर होते. पाच वाजताच उजेड कमी होऊ लागलेला होता. साडेपाचच्या सुमारास आम्ही सेल्युलर जेलसमोर जाऊन पोहोचलो. काही फोटो काढले आणि लाइट अँड साउंड शोला जाऊन बसलो. सात पाखी सेल्युलर जेलच्या मध्य मनोऱ्यानजीक असलेल्या वृक्षराजाच्या साक्षीने कथा गुंफली जाते. अवघड ठरणाऱ्याच राजकीय कैद्यांना विजनवासात ठेवण्यासाठी, अशा प्रकारच्या तुरुंगाची योजना करणाऱ्या ब्रिटिशांच्या बुद्धीने मन स्तिमित होते. जगावर हुकमत गाजवत असतानादेखील लोकशाहीने, कायद्याच्या राज्याने प्रशासन चालविण्याच्या त्यांच्या अट्टाहासाखेरीज; ह्या सव्यापसव्याचे काय कारण असू शकते एरव्ही जगातील जेत्यांनी जितांना नाहीसे करणे; ह्या 'बळी तो कानपिळी' थाटाच्या पाशवी प्रथेपासून, काळ्या पाण्याची शिक्षा तयार करण्याच्या मानवी क्रूर प्रथेपर्यंत ते येते ना! त्या ठिकाणाच्या प्रखर क्रांतिकारकांच्या वास्तव्याने पुनीत झालेल्या भूमीने, देशाकरता जगण्याची दुर्दम्य जिज्ञासा मनात पुन्हा जागी केली.






दुसरा दिवस पोर्ट ब्लेअर शहरदर्शनाचा होता. सकाळच्या सत्रात आम्ही सेल्युलर जेल सविस्तर पाहिला. नंतर चॅथम आरायंत्रही विस्ताराने बघितले. दुपारच्या सत्रात १. पुरातत्त्व संग्रहालय (आंथ्रापॉलॉजिकल म्युझियम), २. मात्स्यिकी संग्रहालय (फिशरीज म्युझियम), ३. नौदलाचे समुद्री संग्रहालय - समुद्रिका - (नेव्हल मरीन म्युझियम), आणि ४. कुटीरोद्योगनिर्मित वस्तूंचा विक्रयहाट - सागरिका - (कॉटेज इंडस्ट्रीज एंपोरियम); ह्या चार गोष्टी बघितल्या.

२६-०२-१९६६ रोजी मुंबई येथे वीर सावरकरांना देवाज्ञा झाली. त्यानंतर बरोब्बर ४९ वर्षांनी आम्ही त्याच तारखेला, पोर्ट ब्लेअरमधील त्यांच्या कोठडीत पोहोचलो होतो. ज्वलंत राष्ट्राभिमानाखातर काळ्या पाण्याची शिक्षा भोगणाऱ्या या दिवंगत नेत्यास आम्ही सुमनांजली वाहिली. त्यांच्या माझे मृत्युपत्र ह्या कवितेचे अखेरचे कडवे सामुदायिकरीत्या म्हटले.

की घेतले व्रत न हे अम्हि अंधतेने ।
लब्धप्रकाश इतिहास निसर्गमाने ॥
जे दिव्य दाहक म्हणूनि असावयाचे ।
बुद्ध्याच वाण धरले करी हे सतीचे ॥







शहिदांनी ज्याकरता प्राणार्पण केले, सावरकरांसारख्या राष्ट्रवीरांनी ज्याकरता अपार कष्ट सोसले त्या राष्ट्राकरता,

दिवा मातीचा आहे की सोन्याचा हे महत्त्वाचं नसून तो अंधारात प्रकाश किती देतो हे महत्त्वाचं आहे. त्याचप्रमाणे मित्र गरीब आहे की श्रीमंत आहे हे महत्त्वाचं नसून तो तुमच्या संकटात किती खंबीरपणे तुमच्या पाठीशी उभा राहतो हे महत्त्वाचं आहे.

अर्थपूर्ण जीवन जगण्याचे आमचे दायित्व पुन्हा एकदा जागृत झाले ! त्या कर्तव्यास आम्ही सदैव लक्षात ठेवू.

केवळ अंदमानातच आढळून येणारा पडौक वृक्ष, ह्या राज्याचा राज्यवृक्ष आहे. तो सुमारे १२० फूट उंच वाढतो. पानगळीचा पर्णसंभार बाळगतो. अशा वृक्षांचे उंचच-उंच जंगल तर नजरेचे पारणेच फेडते. तो अत्यंत भारदस्त दिसतो आणि उत्तम लाकडी वस्तूंकरताचे दर्जेदार लाकूड पुरवतो. पडौक लाकूड हे सागवानी लाकडापेक्षा जास्त सुदृढ असते.

ह्या पडौकवनातील वृक्षांचा वापर, बांधकामाकरता आणि बैठकीच्या सामानांकरता लागणाऱ्या लाकडाच्या गरजा भागवण्याकरता करता यावा, म्हणून १८८३ मध्ये ब्रिटिश सरकारने इथे एका आरायंत्राची स्थापना केली होती[१]. दुर्दैवाने दुसऱ्या महायुद्धात थेट ह्या ठिकाणी स्फोटके पडल्यामुळे यंत्राचे अपरिमित नुकसान झाले. मात्र पूर्व पाकिस्तान, लंका आणि बर्मामधून ब्रिटिशांनी इथे पुनरुत्थानाकरता आणलेल्या लोकांच्या लाकडाबाबतच्या अतिरिक्त गरजा भागविण्याकरता ह्या यंत्राची पुनःस्थापना करण्यात आली.



बिनीच्या अंदमानी पडौक वृक्षाची कटाई, केवळ ह्या सरकारी आरायंत्रावरच केली जाते. हे आरायंत्र चॅथम बेटावर आहे. हे बेट पोर्ट ब्लेअर शहराच्या उत्तरेला आहे. पोर्ट ब्लेअरशी ते केवळ चॅथम पुलानेच जोडलेले आहे. दुपारच्या जेवणापूर्वी आम्ही ह्या आरायंत्राला भेट दिली. पहिल्या चित्रात प्रवेशद्वार आणि उप-वन-संरक्षकांचे कार्यालय दिसत आहे.




खालच्या ओळीत आरायंत्रावर, तसेच मानवी कौशल्याने साधलेल्या लाकडी वस्तू दिसत आहेत. पहिल्या चित्रात उभ्या दिसणाऱ्या दोन बांबूंपैकी एकाचा काप मधल्या चित्रात दिसत आहे. मग दिसते आहे लाकडातून साकारलेली विश्वकर्म्याची मूर्ती. नंतरच्या चित्रात आहे आरायंत्राचे प्रारूप.






खालील पहिल्या चित्रात आरायंत्राकरता, दातेरी आरीचा पट्टा उचलून नेला जात असलेला दिसत आहे. दुसऱ्या चित्रात कापले जाणारे पडौक वृक्षाचे लांबलचक खोड दिसते आहे. त्या कामगाराच्या डाव्या हाताकडील खोडाच्या टोकास आरीचे पाते खोडात उभे घुसलेले स्पष्ट दिसत आहे. उजव्या बाजूस रुळांवरून सरकत पुढे जाणाऱ्या खोडातून कापली गेलेली फळीही, त्या कामगाराच्या उजव्या बाजूस सुटी झालेली दिसते आहे.

शब्दांमुळे माणसे जुळतात आणि तुटतातही म्हणून शब्दांची किंमत समजून घ्या. आहात तोपर्यंत चार प्रेमाचे शब्द वापरा, तेच कामी येतील.





तिसऱ्या दिवशी पोर्ट ब्लेअरपासून फिनिक्स धक्क्यावरून, कोस्टल क्रूझ बोटीने हॅवलॉक बेटावर गेलो. देशात सर्वोत्तम म्हणून पर्यटन खात्याने गौरवलेल्या राधानगरी बीचवर गेलो. पुन्हा समुद्रस्नान केले आणि हॅवलॉक बेटावरच हॉटेल हॉलिडे इनमध्ये राहिलो. राधानगरी बीचवर पैसे देऊन का होईना; पण कपडे बदलण्याची आणि प्रसाधनाची चांगली सोय आहे. हॅवलॉक बेटावरले आमचे वास्तव्य सगळ्यांत आनंददायक होते. हॉटेल हॉलिडे इनमध्ये आम्ही राहिलो होतो. हॉटेलच्या परंपरागत कल्पनेलाच छेद देणारी सगळी व्यवस्था होती तिथे. खूप मजा आली. सर्व अत्याधुनिक सोयीसवलतींसह सुसज्ज, पण झावळ्यांच्या झोपड्या वाटाव्यात अशा खोल्या.



वेताच्या काड्यांना वाकवत वाकवत तयार केलेली मंचके, खुर्च्या, स्तंभ, छत्र्या इत्यादींमुळे जास्तच प्रसन्नतेचे वातावरण निर्माण होत होते. अंदमानातील वृक्षराजींत वेळूची बेटे आणि वेताच्या झुडुपांचा समावेश नक्कीच असणार! जागोजाग फळलेल्या नारळी सर्व दिशांना नारळांचा वर्षाव करत होत्या. सर्वत्र, इथे तिथे सुके नारळ आणि शहाळी पडलेली दिसत होती.







चौथ्या दिवशी सकाळी ८ वाजताच हॉटेल सोडून द्यायचे होते. म्हणून सगळे सामान गोळा करून स्वागतकक्षात रचून ठेवले, नास्ता केला आणि मग आम्ही निघालो एलिफंट बीच बघायला. इथे पहिल्यांदा आमच्यापैकी एका मुलीने (मुलगी कसली, लग्न झाले आहे आता तिचे!) सी-वॉक केले आणि आम्ही सगळ्यांनी स्नॉर्केलिंगचा पुष्कळ प्रयत्न केला. दोन जणांना स्नॉर्केलिंग करण्यात यश आले. इतरांनी त्याचा आनंद लुटला.





**अंदमानी समुद्रातून मासा वेचून आणताना मी**

सावलीला फक्त कारण लागतं प्रकाश कशावर तरी पडण्याचं, सुगंधालाही तेवढंच कारण लागतं वाऱ्यावर स्वार होऊन उडण्याचं.

गळ्यापर्यंतच्या पाण्यात, नाकावर मुखवटा लावून नाकात पाणी शिरण्यापासून बचाव करायचा. डोळ्यांवर समुद्री गॉगल लावून, डोळ्यांत पाणी शिरण्यापासून बचाव करायचा. तोंडात एका नळीचे कवळीच्या आकाराचे एक टोक धरून, दुसरे टोक पाण्याबाहेर तरंगवायचे. ह्या नळीतूनच तोंडाने श्वासोच्छ्वास करायचा. पाण्याच्या पृष्ठभागावर तरते राहून, आणि पाण्यात डोके खुपसून तळ न्याहाळायचा. अशी ही स्नॉर्केलिंगची संकल्पना असल्याचे मला कळले. 'मुख से साँस' घेण्याचे मात्र, मला किंवा इतर बहुसंख्याकांना जमू शकले नाही. पोहणे येत असलेल्या एक-दोघांनाच काय ते साधले. तळ अगदी स्वच्छपणे दिसू शकत असलेल्या - नितळ - पाण्यात डुंबण्याचे सुख मात्र सगळ्यांनाच खूप लाभले. प्रसन्न वाटले. सुनामीमुळे पडलेल्या झाडांचे भग्नावशेष ह्या किनाऱ्यावर विखुरलेले आहेत. त्यांच्या सोबतीने अनेकांची प्रकाशचित्र-सत्रे झाली. इथे मात्र कपडे बदलण्याची आणि प्रसाधनाची कुठलीच सोय त्या दिवशी उपलब्ध झाली नाही. कारण असे सांगितले गेले की त्या व्यवस्थेची किल्ली जवळ बाळगणारी व्यक्तीच आज कामावर हजर नव्हती. असो.

पाचव्या दिवशी वंडूरमार्गे जॉली बॉय बेटावर जायचे होते. वंडूर बंदरावरच महात्मा गांधी राष्ट्रीय समुद्री उद्यानाचे प्रवेशद्वार आहे. ह्या बेटावर प्लास्टिकमुक्त वातावरण सांभाळले जाते. म्हणून बाटलीबंद पाणी नेण्यासही मनाई आहे. दर दोन माणसांगणिक, २०० रुपये अनामत भरून दोन लीटरची एक ओतीव प्लास्टिकची वॉटर बॅग दिली जाते. आपल्या बाटल्यांतील पाणी त्यांत ओतून घेऊन त्या बॅगाच बेटावर नेऊ दिल्या जातात. बाटलीबंद पाण्याच्या बाटल्या वंडूरलाच सोडून द्याव्या लागतात. इथे होणारी प्लॅस्टिकच्या पिशव्यांकरताची तपासणी एवढी इत्थंभूत असते की, सगळ्यांनाच आपापल्या सामानातून असंख्य प्लॅस्टिकच्या पिशव्या आढळून आल्याने टाकून द्याव्या लागल्या. अंदमानात विशेषतः पाण्यात डुंबायचे असल्याने प्रत्येक वस्तू प्लॅस्टिकच्या पिशवीत भरून घेण्याच्या मोहापायी अक्षरशः हैराण व्हावे लागले. प्लॅस्टिकच्या पिशव्या टाकून द्याव्या लागल्या. आतील सामान उघडे पडले. स्त्रियांना तर हा फटका चांगलाच बसला. अशा रितीने आमचा प्लॅस्टिकविरहित प्रवास प्रत्येकी आठ-दहा माणसे नेणाऱ्या छोट्या होड्यांतून जॉली बॉय बेटाकडे सुरू झाला. बेट सुरेखच होते. दृष्ट लागण्यासारखे. अंदमानात आल्यानंतर इथे आम्ही प्रथमच, काचेच्या तळाच्या नावांतून समुद्रतळ बघितला. त्याकरता प्रत्येकी ३०० रुपये घेऊन, एका बोटीतून आठ-आठ जणांना नेऊन, तीन निरनिराळ्या ठिकाणी सागरतळ दाखवण्यात आला. तो कॅमेऱ्यांत बंदिस्त केला.



**अंदमानी सागरतळातील जीवसृष्टी आणि ज्या काचेच्या तळाच्या होडीतून ती दिसली, ती होडी.**

जॉली बॉय बेटावर आम्ही पॅक लंच नेलेले होते. किनार्यावरील तिवरांच्या जंगलात, तिवरांच्या झाडांच्या जमीन-समांतर फांद्यांवर, तर कुठे विशेष तयार केलेल्या बाकड्यांवर आणि कुटिरांत आम्ही स्वेच्छा-सहभोजनाचा लाभ घेतला.

सहाव्या दिवशी नॉर्थ बे बेटावर समुद्रसंचार (सी-वॉक), मग ब्रिटिश प्रशासनाचे अंदमानातील मुख्यालय राहिलेल्या रॉस बेटावर विहारफेरी आणि पोर्ट ब्लेअरला परत, असे नियोजन होते. हा सगळा प्रवास आम्ही अबर्दीन धक्यावरून एम.व्ही.जया नावाच्या पन्नास आसनी बोटीतून केला.

---

प्रत्येक मोठी गोष्ट चांगली असतेच असे नाही, पण प्रत्येक चांगली गोष्ट मोठी असतेच.

नॉर्थ बे आयलँडच्या किनाऱ्याजवळच सी-लिंक कंपनीचे सी-वॉकर हे जहाज उभे आहे. पोर्ट ब्लेअरवरून समुद्रसंचार करू इच्छिणाऱ्या पर्यटकांना ह्या जहाजावर आणतात. ह्या समुद्रसंचाराकरताचे रु.३,२००/- चे तिकीट वेगळे घ्यावे लागते. स्कूबा डायव्हिंगकरता रु.३,५००/- चे तिकीट पडते. मात्र, ह्यात प्रत्येक स्कूबा डायव्हरसोबत एक स्वतंत्र पाणबुड्या दिला जात असतो. स्कूबा डायव्हिंगकरता पोहणे यावे लागते. पोर्ट ब्लेअरवरून येतांना, एका छोट्या स्वयंचलित होडीतून, जहाजालगत उभ्या असलेल्या दुसऱ्या होडीत आणि तिथून ह्या जहाजात आपण प्रवेश करतो.



इथेच कपडे बदलण्याकरता चेंजिंग रूम, आपले व्यक्तिगत सामान ठेवण्याकरता लॉकर इत्यादी पुरवले जाईल असेही तिकीट देताना सांगितले जाते. प्रत्यक्षात मात्र इथे चेंजिंग रूमच्या नावाखाली एक झापड असलेला आडोसा आणि लॉकरच्या नावाखाली झाकणे असलेले अपुरे कप्पे एका रॅकमध्ये उपलब्ध आहेत. मात्र त्याला कडीकुलूप करावे अशी कोणतीही सोय नाही. समुद्रसंचाराच्या कल्पनेने भारावलेले पर्यटक ह्याच तुटपुंज्या सेवांचा आनंद सुखाने घेत असतात. प्रशासकीय अधिकारी सुखासीन ठेवले जात असणार, त्यामुळे त्यांचीही फारशी अडचण होत नाही. तरीही, समुद्रसंचार कंपनीचे सर्व कर्मचारी आणि त्यांचा प्रत्यक्ष व्यवहार प्रामाणिक, सचोटीचा नि विश्वास निर्माण करणारा आहे, ह्यात मुळीच संशय नाही.

जहाजाच्या मागच्या बाजूला, साधारण जहाजाच्याच आकाराच्या गोलाकार समुद्राला, तरत्या गोलकांच्या आधारे तळापर्यंत लोंबणारे जाळे लावून बंदिस्त केलेले आहे. जहाजावरून एक लोखंडी शिडी तळापर्यंत उतरवलेली आहे. तिच्यावरून समुद्राकडे पाठ करून, नेसत्या कपड्यांनिशी आपण दोन-चार पायऱ्या उतरून तळाकडे निघालो, म्हणजे गळ्यापर्यंत पाण्यात शिरल्यावर, ३२ किलो वजनाचे हवेशीर, म्हणजे पाठीमागच्या बाजूने दाबित हवेची नळी जोडलेली असते असे, शिरस्त्राण आपल्या डोक्यावर चढवले जाते. जहाजावर एक मोठ्ठा हवादाबक (काँप्रेसर) असून त्यातून दाबित हवा आणणाऱ्या सुमारे एक सेंटिमीटर व्यासाच्या लांबलचक (पन्नास, शंभर मीटर लांबीच्या असाव्यात) नळ्या शिरस्त्राणास जोडलेल्या असतात. अगदी चश्मा घालूनही हे शिरस्त्राण चढवले जाते. कारण शिरस्त्राणाच्या आतील भाग कोरडाच राहत असतो, शिवाय चश्मा घातल्याने आपण नेहमीसारखेच स्वच्छ पाहूही शकत असतो. शिरस्त्राणाचे आकारमान असे असते की, त्याचे पाण्यातील वजन केवळ ७ किलोच भरते. मात्र, ह्या ७ किलोच्या अतिरिक्त वजनामुळेही आपण सागरतळाकडे लोटले जाऊ लागतो. अशा वेळी, सोबत करत असलेला पाणबुड्या आपल्याला शिडी सोडायची खूण करतो आणि ती सोडताच आपण त्याचा हात धरून झपाट्याने सागरतळाशी पोहोचतो. इथे सागरतळ साधारणपणे ५ मीटर म्हणजे सुमारे १५ फूट खोल असतो. अर्थात हवेची नळी कायमच हवादाबकाला जोडलेली राहून आपल्याला दाबित हवेचा पुरवठा करत राहते. शिरस्त्राणाच्या आतील हवेच्या दाबाने बाहेरचे पाणी शिरस्त्राणामध्ये शिरू शकत नाही. आपण बाहेरच्यासारखाच सुखाने श्वासोच्छ्वास करत राहतो.

---

दुःख हे कधीच दागिन्यासारखं मिरवू नका. वाटू शकलात तर आपला आनंद वाटा. लोक तुमच्याकडून आनंदाची अपेक्षा करतात, कारण दुःख त्यांच्याकडे पण भरपूर आहे. - स्वामी विवेकानंद




समुद्रसंचार करणाऱ्या आठदहा संचारकर्त्यांमागे तीन पाणबुडे सोबत असतात. आमचा गट आठ जणांचा होता. आमच्याचसोबत पर्यटन करणारे पाच जण आणि नवरा, बायको व त्यांचा सुमारे दहा वर्षांचा एक मुलगा असे इतर तिघे बंगाली भाषक, ह्यांचा हा गट होता. तळाशी पोहोचल्यावर संचारकर्त्यांची हातात हात देऊन एक माळ तयार केली जाते. त्या माळेच्या एका टोकास एक तर दुसऱ्या टोकास दुसरा पाणबुड्या हाती धरून मार्गदर्शन करत असतो. काय करायचे आहे ते खुणेने समजावून सांगण्याचे त्यांचे कसब मला फारच अपूर्व भासले. आवडले. तिसरा पाणबुड्या जलगच्च प्रकाशचित्रकाने (वॉटरटाइट कॅमऱ्याने) संचारकर्त्यांचे फोटो काढत असतो. आपण बाहेर येऊन कपडे बदलेपर्यंत, अशा प्रत्येकी १२ फोटोंची एक सी.डी.ही तयार करून आपल्या हाती देत असतात.

आत शिरण्यापूर्वी आम्हां आठ-जणांना एकत्र करून जहाजावरील एका ज्येष्ठ खलाशाने एक पाच मिनिटांचे व्याख्यान दिले. पाण्यात न विरघळणाऱ्या शाईचा वापर करून, आठही जणांच्या उजव्या हाताच्या तळव्यामागे ए-८ असे इंग्रजीत लिहूनही ठेवण्यात आले. पाणबुड्यांना आमची ओळख पटावी म्हणून. आपण सुंदर आहोत असे दाखविण्यासाठी करतो ती हस्तमुद्रा; 'मला जमते आहे. मी स्वस्थ आहे. आता समुद्रसंचार करू या' असे सोबतच्या पाणबुड्यांना सांगण्याकरता वापरावी असे सांगण्यात आले. तसेच उजव्या हाताचा अंगठा वरच्या दिशेने दाखवल्यास; 'मला ताबडतोब बाहेर काढा. अस्वस्थ वाटते आहे.' असा अर्थ सोबतच्या पाणबुड्यांना कळेल आणि ते तुम्हांला तत्काळ बाहेर काढतील असेही सांगण्यात आले. मात्र ह्यांव्यतिरिक्त इतर कुठल्याही हावभावांना आणि खुणांना समुद्रसंचारासंदर्भात काहीही अर्थ नाही, असे बजावून सांगण्यात आले.



खरेतर मी तासाभरापासून नंबर लागण्याची वाट पाहत होतो. लघवीची भावनाही होत होती. मात्र जहाजावर स्वच्छतागृहच नसल्याने, तशी सोय नव्हती. समुद्रात उतरल्यावर सहज विसर्जनाचा विचारही उद्भवला होताच. मात्र प्रत्यक्षात पाण्यात, समुद्रतळाशी पोहोचल्यावर आजूबाजूच्या वाढत्या दाबाच्या प्रभावाने ती भावनाही क्षीण होऊन नामशेष झाली.

आता आमच्यासोबतच्या एका महिलेस, 'फ्लोट होत आहेत' ह्या कारणास्तव बाहेर काढण्यात आले. त्यांचे म्हणणे असे होते की, 'मला चांगले जमते आहे' ह्या अर्थाने त्यांनी उजव्या हाताचा अंगठा वर करून दाखवला. मात्र आधीच सांगितल्याप्रमाणे ही खूण चुकीची ठरल्याने त्यांना बाहेर काढले गेले. तरीही त्यांचे पूर्ण पैसे, सी-लिंकने संध्याकाळपर्यंत परत केलेले होते. इथे हे नमूद करावे लागेल की, सागरतळाशी अशा शिरस्त्राणासह वावरत असताना, आपले पाण्यातले वजन कमी भरत असल्याने, चालण्याकरता हलकेच पाऊल उचलले तरी, उडी मारल्यासारखे शरीर वर उसळत असते. अशा परिस्थितीत जमिनीवर पावले रोवून ठेवणे आणि ताठ, सरळ उभे राहणे अत्यंत जरूर ठरते. कारण ह्या उसळीचा आपल्याला अंदाज यायला जरासा वेळच लागतो. शिवाय आपण खाली वाकलो तर शिरस्त्राणात पाणी शिरून आपण बुडण्याचा धोका संभवतो. एका पाणबुड्यास तीन-चार संचारकर्त्यांवर लक्ष ठेवायचे असल्याने आणि त्याच्यावर त्यांच्या सुरक्षिततेची जबाबदारी असल्याने,

मोठी माणसे व छोटी मुले यांना जोडणारा एक पूल म्हणजे खेळकरपणा होय. - वि. स. खांडेकर

अशा प्रकारे अस्थिर होणाऱ्या व्यक्तीस बाहेर काढणे त्यांना क्रमप्राप्तच ठरत असणार.

पहिल्या संचारकर्त्यास हाताने धरून तळाशी गेलेला पाणबुड्या खालीच थांबला. दुसऱ्या पाणबुड्याने मग एक-एक करून इतर संचारकर्त्यांना खाली आणले. त्यांच्या हातात आधीच खाली उतरलेल्या संचारकर्त्याचा हात सुपूर्त करून तो इतरांना आणायला वर जात असे. तोपर्यंत तळाशी आलेले संचारकर्ते परस्परांचे हात हातात घेऊन समोरच्या दिशेने वाट चालण्याकरता सज्ज होऊन राहत. त्यांच्या माळेच्या एका टोकास पहिल्या पाणबुड्याने घट्ट धरून ठेवलेले होतेच. आता डोक्यावर शिरस्त्राण, त्यास पाठीमागे जोडलेली हवेची नळी अशा एक-एक करून आठही संचारकर्त्यांना दोन पाणबुड्यांच्या संचाने तळापर्यंत आणून सोडले होते. सगळ्यांची तोंडे समोरच्या बाजूला आणि पाठी जहाजाकडे होत्या. त्याच दिशेने सगळ्यांच्या हवेच्या नळयाही जहाजावरील हवादाबकापर्यंत गेलेल्या होत्या. माळेच्या दोन्हीही टोकांना पाणबुडे होते. अशी मालिका मग एका विहीरसदृश खळग्याच्या कडेवरील पांढऱ्याशुभ्र बारीक वाळूच्या पाऊलवाटेवरून मार्ग चालू लागली.

खळग्यात एके ठिकाणी एक मोठासा खडक उभा होता. त्यावर गुलाबी रंगाची सजीव पोवळी लगडलेली होती. झुडुपांप्रमाणे डोलत होती. मग एका पाणबुड्याने आम्हां एकेकाला सुटे करून आमचा हात त्या पोवळ्यांस लावून दिला. सगळ्यांत अखेरच्या चित्रात तळाशी मध्यभागी असलेले तपकिरी पोवळे, आम्ही हात लावताच गर्द निळे, जांभळे दिसू लागले. लाजाळूसारखे मिटलेही. हाच प्रयोग मग आम्ही सुट्यासुट्याने आणि एकत्रितपणेही केला. दरम्यान तिसरा पाणबुड्या खडकाच्या दुसऱ्या बाजूस जाऊन, जलगच्च प्रकाशचित्रकाने आमचे फोटो काढत होता. आजूबाजूला रंगीबेरंगी मासे स्वैर संचार करत होते. त्यांना हात लावून पाहण्याचे आमचे प्रयत्न मात्र असफल होत असत. एक म्हणजे ते अत्यंत चपळ असत. दुसरे म्हणजे पाण्यात खोल असल्याने आमच्या हालचाली अतिशय मंद होत. आणि तिसरे म्हणजे शिरस्त्राणाच्या काचेतून खोलीचा अदमास योग्य प्रकारे येतच नव्हता.

आता आम्हांला हा समुद्रसंचार आवडू लागला होता. पण हे सगळे होईपर्यंत आम्हांला वेळेचे भानच राहिलेले नव्हते. सुमारे अर्धा तास तरी गेला असावा. मग जसे खाली आणले होते, तसेच एकेकाला वर नेण्याची प्रक्रिया सुरू झाली. एक पाणबुड्या मालिकेचे एक टोक धरून तळाशी थांबला. दुसरा एकेकास शिडीपर्यंत नेऊन, तिच्यावरून वरपर्यंत नेई. शिरस्त्राण पृष्ठभागाशी पोहोचताच जहाजावरील कर्मचारी ते काढून बाजूला करी, त्याची नळी काढून टाकी आणि ते बाजूला ठेवून देई. अवजड सामान गाडीत चढवून घ्यावे तसे ते दृश्य दिसे.

बाहेर येणारा विजयी वीराच्या आविर्भावात असे. अद्भुत दर्शनाचा आनंद त्याच्या चेहऱ्यावर ओसंडून वाहत असे. तर आत उतरण्यास तयार असलेले लोक, आपल्या असंख्य प्रश्नांची उत्तरे त्यांना विचारत असताना दिसत असत. अशा प्रकारे आमचा हा अद्भुतातला प्रवास सुखरूप पार पडला!

नॉर्थ बे बेटावरून पोर्ट ब्लेअरला परतताना रॉस बेटावर जेवण करायचे होते. जया नावाच्या बोटीतून आम्ही मार्ग आक्रमू लागलो. रॉस बेट, पोर्ट ब्लेअर शहरातून सारखेच दिसत राहते. सुरेख दिसते.



बेट स्वच्छ सांभाळलेले दिसून येते. महासागरी नैसर्गिक सौंदर्याचे कोंदण तर त्याला लाभलेलेच आहे.

---

माणसाच्या बाबतीत परमेश्वर कमालीच्या दयाळूपणाने वागलाय. जन्माची चाहूल तो नऊ महिने अगोदर देतो; पण मृत्यूचं येणं मात्र अकस्मात असतं. कारण त्याला माहितीय, माणूस सुखाची वाट पाहू शकतो; दुःख येणार हे मात्र पचवू शकत नाही.

त्यामुळे ते आवडतेही. बेटावर अरुंधती राव नावाची एक खासगी मार्गदर्शक आहे. ती माफक दरात शुल्क घेऊन पर्यटकांचे प्रबोधन करत असते. मात्र तिची खासियत ही आहे की ती, खारी, हरणे, ससे, मोर इत्यादिकांना त्यांच्या नावाने हाका मारते. ते सर्व जण येतात. ती मग सोबत आणलेले ब्रेड त्यांना खायला देते. हे हरीण बदमाश आहे, लहान मुलांना मारेल, सांभाळा. ते हरीण आंधळे आहे, काही करणार नाही, अशी माहितीही देत असते. प्रवासी तिच्या व्याख्यानांवर खूश असतात. त्या प्राण्यांसोबत आपापली प्रकाशचित्रे काढून घेत असतात. तेही सुखाने प्रकाशचित्रे काढू देत असतात. अशा रितीने रॉस बेटाची संस्मरणीय सफर, तासाभरात सुखाने संपन्न होते.





**अरुंधती रावने ओढणीत बांधून घेतलेला जखमी ससा आणि तिने बोलावल्यावर धावून आलेली हरणे.**

परतीचा प्रवास दुसऱ्या दिवशी विमानाने चेन्नईकडे उड्डाण करून सुरू झाला. प्रवासाला निघाल्यावर विमानातून भारतभूमीची प्रकाशचित्रे काढावी अशी इच्छा झाली खरी. पण कॅमेरा बंदिस्त करून चेक-इन लगेजमध्ये ठेवलेला होता आणि मोबाइल बंद केलेला होता.





परतीच्या प्रवासात मात्र आठवणीने मोबाइल फ्लाइट मोडवर टाकून, विमानातून असंख्य प्रकाशचित्रे काढली. खाली दिसणाऱ्या दृशांचा, ज्ञात भौगोलिक ठिकाणांशी संबंध जोडायचे प्रयत्न मात्र यशस्वी झाले नव्हते. घरी आल्यावर जेव्हा असे प्रयत्न वेगळ्याने केले तेव्हा, कृष्णा नदीवरले येरलवाडी आणि शिरसवाडी धरण मात्र विमानातून काढलेल्या फोटोत, त्यांच्या आकारांवरून आणि परस्पर तुलनेतील त्यांच्या स्थानांवरून स्पष्ट ओळखू येत आहे. त्यानंतर संपूच नये असा वाटणारा अंदमानाचा प्रवास लवकरच पूर्णत्वास आला. मुंबई विमानतळावर त्याची सांगता झाली.

[१]अंदमान आणि निकोबार राज्याच्या वनखात्याचे संकेतस्थळ

http://forest.and.nic.in/frst sawmillchatham1.htm

**नरेंद्र गोळे**

१०४ दत्तात्रय प्रसन्न, जोशीवाडी,

टिळकपथ छेदगल्ली, टिळकनगर,

डोंबिवली (पू.) - ४२१२०१

भ्रमणध्वनी : ९९३०५०१३३५

Email : narendra.v.gole@gmail.com

●●●

# नर्मदा परिक्रमा

**भाग : १८**

*नर्मदा परिक्रमेतील हा पुढचा टप्पा. लेखकाचे चौफेर निरीक्षण, भेटलेली माणसे या नोंदी वाचण्यासारख्या आहेत - संपादक*

**दिवस ५३ वा गंगातखेडी-सुरतीपुरा (रुपावेडी १ किमी) तलाव मु. नागमंदिर सकाळी ७ ते संध्या.५**

गंगातखेडीमधून गावागावातून जाणाऱ्या कच्च्या रस्त्याने मार्गक्रमण. गंगातखेडी गाव अगदी नर्मदातटाशी! जवळपास गावापासून पुढील गावापर्यंत म्हणजे ४।५ कि.मी. एक कुत्र्याचे पिल्लू आमच्या मागे मागे म्हणजे आमच्याबरोबर होते. पुढील गावात एक कुत्रा जवळ आल्यावर एका घरात पटकन शिरले, नंतर दिसले नाही.

वाटेत एकाने चहा दिला व मैय्याजवळून खेडीघाटापर्यंतचा रस्ता सांगितला. सेवा व्हावी म्हणून पहिली शेती विकून परिक्रमामार्गावर जमीन विकत घेतली!

पुढील गाव कोळी वस्तीचे व लहान वाटले. या गावापर्यंत थोडीबहुत झाडी होती. पण यापुढे दाट झाडी असल्याने छान सावली होती.

पुढल्याच गावात कुणीतरी पपई दिली, ती खाल्ली. कालसुद्धा कुणी सायकलवरील विक्रेत्याने पपईच्या मोठ्या फोडी दिल्या होत्या त्याची आठवण झाली.

गावातून बाहेर पडलो आणि टळटळीत उन्हात चालावे लागले कारण बोडका रस्ता. पावणेअकरा वाजता 'नर्मदा निकुंज' या छान आश्रयात विश्रांतीसाठी डोकावले तर सहा-सात तेजस्वी संन्यासी पानावर बसले होते. आम्हीही बाटी, डाळ, भात असे पूर्ण भोजन केले व नंतर मैय्यावर जाऊन स्नान केले. रतनलाल नावाचे धनिक व्यापारी आश्रमाचे कर्ताधर्ता असावेत. कारण अंगणात खुर्ची टाकून ते ज्या पद्धतीने आदरातिथ्य करत होते त्यावरून वाटले!

स्नान केले तेव्हा मोरटक्क्याचा नर्मदा पूल दिसला. तीन वाजता आम्ही भर उन्हातून खेडी घाट गाठला. हा घाट म्हणजे रेल्वे स्टेशनजवळ आणि बहुधा मोरटक्का पलीकडे तर खेडी घाट अलीकडे!

दगडू महाराज - मराठी संताचा आश्रम अशी कीर्ती ऐकून असे उन्हातून तापत तापत आश्रम गाठला. चहा विचारला तर उत्तर मिळाले, चार वाजता मिळेल! मराठी बाणा पाहून निघालो. तत्पूर्वी तेथील प्रचंड वटवृक्षाचे फोटो घेतले.



दगडू महाराज आश्रमातून खाली उतरलो. कसरत करीत एक प्रवाह (उपनदी) ओलांडून पलीकडील टेकडीवर चढलो. तिथे आग्रहापूर्वक चहा मिळाला.

एक वयस्कर बाबा पत्नीसह एका छोट्या कुटीत नदीकिनारी या उंच तीरावर राहतात. कुटी म्हणजे लाकडी मांडवाला तीन बाजूंनी प्लास्टिक लावलेली शेड! बाबांना ऐकू येत नाही. पत्नी ओंकारेश्वरास गेली होती.

जिने आम्हांला चहा करून दिला ती त्यांची विवाहित

---

माणसानं काय काय कमावलं आहे याची यादी जरी इतरांजवळ असली तरी आपण काय काय गमावल आहे ह्याची यादी मात्र त्याच्याजवळच असते. - व. पू. काळे

मुलगी होती, आईवडिलांना भेटायला आलेली ! बाबा आम्हांला राहण्याचा आग्रह करीत होते.

मैय्याचे पूर्ण सामीप्य व प्रसन्न दर्शन या हेतूनेच ही कुटी मैय्याकिनारी उभारली होती. तेथून वर चढून शेतांमधील पायवाटेने आम्ही रुपाबेडी गाठले तेव्हा थकलो होतो; परंतु इथे मुक्काम न करता १/२ कि.मी. वरील सुरतीपुरा तलावाजवळ आश्रम आहे, तिथे जा असा सल्ला, नाइलाजाने तंगड्या तोडत तासभराने अगदी जंगलात असलेल्या नागमंदिरात पोहोचलो. १५/२० मिनिटे मी बूटसुद्धा न काढता बसून राहिलो. नागमंदिर प्राचीन आहे. राजे यशवंतराव होळकर यांच्या आवडीचे शिकारस्थान. कारण इथे पूर्वी एक छोटा तलाव होता, त्या पाणवठ्यावर उन्हाळ्यात पशू येत.

आता हा तलाव खूप मोठा केला आहे आणि एक विहीरही त्यात असल्याची खूण आहे. या तलावाजवळ हे नीट बांधलेले नागमंदिर आहे. वीज कंपनीतून निवृत्त झालेल्या हरिप्रसाद बाबाने स्वतः माती खणून जमीन समतल केली आणि या संसारी बाबाच्या आधिपत्याखाली हे मंदिर आहे. मंदिराला दोन पाखा आहेत. प्रत्येकात १००/१५० माणसे सहज राहतील.

रात्री चूल पेटवायला लागणारी साधने मिळाली. चहा झाला. एका मोठ्या पातेल्यात पाणी गरम करत ठेवले. थोड्या वेळाने त्याच्या मुलाने दूध आणले.



दरम्यान खिचडीच्या इराद्याने मी बटाटे, टमाटे कापले. तयारी झाली आणि कळले की खिचडीला तांदूळ नाहीत. मुलाने दूध आणून दिले होते. त्यालाच बाबांनी फोन केला व तांदूळ आणायला सांगितले. तांदूळ येतील तोपर्यंत न कापलेले बटाटे उकडावे म्हणून चुलीवर ठेवले. वाट पाहून पातेले रिकामे केले. फोडणी केली व कापलेले बटाटे, भुघर (मोठा घेवडा), टमाटे हे सारे आणि उकडण्यासाठी घातलेले बटाटे पाण्यासह पातेल्यात घातले. बाबांनी चूल पेटवायला मदत केली होतीच. नंतर खिचडी मिक्स मसाल्यासह १/२ किलो पिशवी आली. आम्ही तिघे + पीरु बाबा आणि पत्नी गोराबाई एवढे जण आनंदात जेवलो.

मंदिराचा चौकीदार आदिवासी, सतत प्यायलेला आणि जुनी गाणी ओठावर घोळविणारा ! बरोबर ट्रान्झिस्टर, त्यावर बातम्या आवडीने लावून ऐकणारा आणि ऐकविणारा!

रात्री उशिरापर्यंत त्याची बडबड सुरू होती. सोबत ३ कुत्रे होते. त्यांच्यासाठी पोळ्या करून त्यानेच त्यांना खायला घातले.

गावापासून दूर निमर्नुष्य जंगलात हे स्थान आहे.

**दिवस ५४ वा सुरतीपुरा (रुपाबेडी) - कोटेश्वर - कोठावा - मोदडिया (च्यवनाश्रम) सकाळी ७॥ ते संध्या ३.४५**

सकाळी चहा घेऊन निघालो आणि प्रसन्न दाट जंगलातून वाटचाल सुरू झाली. कोटेश्वर टाळून बडेलाश्रम संध्याकाळपर्यंत गाठता येईल असे हरिप्रसाद बाबांनी सांगितले होते.

दोन रस्ते, उजवीकडे जाणारा कोटेश्वर मंदिराकडे कारण तशी पाटी लावलेली होती. एक रस्ता सरळ पुढे जात होता. संभ्रम निर्माण झाला. कोटेश्वरला जाऊन पुन्हा परत यावे लागते हे ऐकलेले होते. कल्पना झाली की कोटेश्वर

एखाद्या अडचणीत देवाने तुमचे लगेच ऐकले की तुमची श्रद्धा वाढते. उशिरा ऐकले की, तुमची सहनशक्ती वाढते. पण ऐकलेच नाही तर, देवाला ठाऊक आहे; ही अडचण तुमची तुम्हीच सोडवू शकता.

रस्ताच पुढे इच्छित ठिकाणी जाईल फाट्याजवळ रानातून ४-५ जण आडवे गेले पण आवाज देऊनही कुणी थांबले नाही. अखेर कोटेश्वर मार्गाने पुढे गेलो आणि तेथील डोलारी आश्रमात समजले की सोडला तो रस्ता बडेलाश्रमाचा होता. आता मैय्याने ठरविलेल्या योजनेनुसारच जाणे आले.

चहा घेऊन टेकडी चढलो, उतारावर मैय्याकिनारी कोटेश्वर मंदिर होते. महिम्नाचा पाठ चालताना सुरू केला होता.

मैय्याकिनारी टेकडीच्या पलीकडील उतारावर कोटेश्वर महादेवाचे प्राचीन मंदिर आहे. महिम्मपाठ चालताना सुरू होता तो मंदिरात पूर्ण झाला. पुन्हा मागे जाऊन पुढील टप्पा गाठण्याऐवजी मैय्याकिनाऱ्यावरून जाण्याचा निर्णय घेतला व कोटेश्वर मंदिराच्या बाजूने मैय्याकिनारी उतरलो. पाय रुतेल इतकी, वस्त्रगाळ वाळू सुरू झाली. जवळपास चालता येणे कठीण झाले तेव्हा जरा वरच्या अंगाने चढावरून मार्गक्रमण सुरू केले. पाऊलवाट नव्हतीच, उतरणीवरील मातीरेती पाय टाकला की सरळ खाली सरकायची. अगदी जपून पावले टाकत, पूर्ण अवधान ठेवून तसेच पुढे पुढे जात राहिलो. समोरच्या तटावरील एखादा आश्रम, किनारा, मागच्या अंगाला मोरटक्क्याचा (खेडाघाट) पूल दिसत होता. हळूहळू वाट कठीण व्हायला लागली. लहानमोठे खडक, दगड, ओलांडायला कठीण असे कडे आणि काय काय कस पाहायला लागले. माथ्यावर जाणारी वाट किंवा घळीतून पलीकडे जाणारी पायवाट शोधावी तर आशा वाटाच नव्हत्या. गुरांच्या पाऊलखुणा किंवा शेण इ. काही काही दिसेना. ९ च्या सुमारास कोटेश्वरहून खाली उतरलो. अर्धा तास गेला, एक तास गेला, दीड तास गेला, दोन तास गेले. कुणाही माणसाचा/गुरांचा/पायवाटेचा मागमूस नाही. समोर तटावर हालचाल नाही. 'नर्मदे हर' चा पुकारा पडसाद देत पुन्हा आमच्याकडेच परत येत होता.

घळीत जायच्या प्रयत्नात समोरच्या तटावरून 'नर्मदे हर' चा ध्वनी सांगत आला, सीधे मैय्याकिनारे चलो ! सरळ जाणे कठीण होतेच, पण घसरगुंड्या सावधपणे पार करत, एकमेकांना हात देत आम्ही पुन्हा पहाडी खडकांमध्ये चढलो. तीव्र उतार, त्यावर हे पाषाणखण्ड, विशेष म्हणजे कालपासून मला वाटेत लाल (गुलाबी) दगड आढळू लागले होते. आज पाहिले तर हे पहाड लाल रंगाच्या खडकांचेच होते. किनाऱ्याजवळील लाल पत्थरांवर लाटा कोरल्या गेल्या होत्या. मी त्यांचे फोटोही काढले आहेत.



कधी नव्हे तो एक साप आढळला. १/४'' पेक्षा कमी जाड आणि ८''/१०'' लांबी. मला तर अगोदर बुटाची नाडी पडल्याचा भास झाला. त्याचाही फोटो घेतला.

अखेर पहाडी खडकांचा कोपरा ओलांडला आणि नदीवर पोहोचलेले एक फूटपाथवजा बांधकाम दूरवर दिसले.

मानवी अस्तित्वाची ही खूण पाहून आनंद झाला. कारण त्या रेषेच्या मागोव्याने वर पाहिले तर एक धवल वास्तू दिसली. आश्रम!

तसे पाहिले तर या अर्ध्या तासात काही खुणा आढळत होत्या. एक पायवाट, गुरांच्या खुरांच्या/विशेषतः शेळ्यामेंढ्यांच्या पाऊलखुणा मातीत डोंगरावरील पायवाटेवर दिसत होत्या. एका झाडाखाली (डोंगरउतारावर) नारळाच्या चोई दिसल्या होत्या.

---

सतत गोड बोलून तुमच्या तोंडावर स्तुती करणारे अनेक भेटतील, परंतु तुमच्या भल्यासाठी तुमच्या तोंडावर तुमच्या चुका सांगून टीका करणारे फार दुर्मीळ असतात. त्यांना ओळखायला शिका.



परंतु या वाटेने कुणीही येत नसावे. हा भाग फार तीव्र उताराचा, खडकांचा, मोठमोठ्या दगडांचा व घसरत्या मातीचा/रेतीचा असल्याने वावर नसावा.

संपूर्ण वेळ मैय्याकिनारी काही अंतर सोडून एक पांढरा पट्टा दिसत होता. हे मेलेले कीटक असावेत. पूर्वी पलीकडील तटावर असेच पांढरे (पंखवाले) कीटक लाखोलाखोंच्या संख्येने किनाऱ्यापाशी, किनाऱ्याला समांतर वाहताना आढळले होते.

दिव्याकडे आकृष्ट होऊन झेपावणारे हे कीटक पाण्यातील चंद्रबिंब पाहून तर पाण्यात झेपावून मरत नसावेत?

साडेअकराला म्हणजे २॥ तासांनी पहिलावहिला आनंददायक चैतन्यस्पर्श, मानवी मिळाला.

स्वच्छ पाणी. मी आश्रमात न जाता सरळ नदीवर गेलो, कपडे धुतले, स्नान केले व आश्रमात गेलो. काल आमच्याबरोबर वास्तव्याला असलेले पीरु, गोरा-जोडपे भेटले. त्यांनी खिचडी केली व जेवले, आम्हांला मात्र नशिबाने तयार भोजन, जे आमच्यापुरतेच उरलेले होते ते मिळाले.

नवल म्हणजे सदावर्त न घेता तयार भोजन घेणारे हे जोडपे, छान खिचडी करून जेवले आणि आज सकाळी चहासाठी चूल पेटवायची होती तेव्हा गोराबाईंनी जराही पुढाकार घेतला नव्हता. खरे म्हणजे मी काल खिचडी केली तेव्हा गोराबाई मदत करू शकली असती.

भोजनोत्तर दुपारी १॥ वाजता आश्रम सोडला व मैय्याकिनाराही सोडला. सकाळी नदीवर भन्नाट वारा होता. आता वाट पुन्हा घनदाट अरण्यातून! वैशिष्ट्य म्हणजे शेकडो हजारो बिल्ववृक्ष ! हे **बिल्वारण्य** म्हणावे इतके वृक्ष.

साग, पळस, औदुंबर, पिंपळ, आंबा, निगडी, कडुलिंब आणि हे बिल्ववृक्ष यांनी हा सारा आसमंत व्यापला होता. बिल्वारण्य ही एक अद्भुत गोष्ट मला वाटली.

तासाभराच्या मंगलमय जंगलमय गाडी (कच्च्या) रस्त्याने च्यवनाश्रम गाठला तेव्हा दुपारचे तीनसुद्धा वाजले नव्हते. मोदडी या गावालगतच्या या आश्रमात सौरशक्तीपर दिवे लागतात त्यामुळे अत्यावश्यक गरजा सोडल्यास खोल्यांमध्ये इ. दिवे वापरता येत नाहीत. खोलीत कनेक्शन आहे, दिवे-पंखे आहेत; पण बंद!

गावातही वीज नाही. बांधामुळे वन्य पशूंचे निवास पाण्याखाली गेल्याने इथल्या घनदाट अरण्यात हे पशू आले आहेत अशी माहिती मिळाली.

मोदडी च्यवनाश्रमाला अखंड पाणीपुरवठा आहे. वीज नाही पंप नाही; परंतु गोमुखात २४ तास मोठ्या धारेने पाणी वाटते, तेच पाणी टाकीतून पुढे प्रवाहित केलेले आहे.

या गोमुखाला असलेले पाणी म्हणजे पाताळकुवाँ आहे. पाताळामधून हे पाणी वर येते व अखंड वाहत राहते; वर्षानुवर्षे!

**अरविंद ओक**
मानपाडा, डोंबिवली.
भ्रमणध्वनी : ०९८३३४४१५८०

●●●

या जगात मानाने जगायचे असेल तर लोकांपुढे वारंवार हात जोडू नका. मेहनत व परिश्रम करायला शिका, यश सदैव तुमच्याबरोबर राहील व लोक कायम यशस्वी लोकांच्या बरोबर असतात.

# स्वप्नांना पंख देणारे डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम

*डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांना श्रद्धांजली वाहणारा लेख - संपादक*

**''झाले बहु । आहेतही बहु।।
होतील बहु । परंतु यासम हा ।।''**

असं ज्यांचं वर्णन करता येईल असं व्यक्तिमत्त्व म्हणजे भारताचे माजी दिवंगत राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम होत. स्वतः निर्माण केलेले अग्निपंख घेऊन डॉ. कलाम महानिर्वाणाच्या दिशेने झेपावले आणि तरीही त्यांच्या असंख्य चाहत्यांचा, त्यांच्यावर प्रेम करणाऱ्यांचा मात्र या गोष्टीवर विश्वास बसत नाहीये. त्यांचं पार्थिव जरी आपल्यात नसलं तरी संतांच्या वचनाप्रमाणे 'मरावे परी कीर्तिरुपे उरावे' तसे ते आता जनमानसाच्या अंतरात, त्यांनी दिलेल्या प्रेरक वचनांत, त्यांनी पाहिलेल्या प्रगतीच्या स्वप्नांत, देशासाठी त्यांनी केलेल्या मौलिक कामांत सर्वांना जाणवत रहाणार आहेत.



डॉ. कलाम यांचा जन्म १५ ऑक्टोबर १९३१ रोजी तामीळनाडूतील रामेश्वरम इथे झाला. त्यांचे वडील मच्छीमार नौका चालवण्याचा व्यवसाय करीत. वडिलांना आर्थिक मदतीसाठी ते वयाच्या आठव्या वर्षापासून घरोघरी वर्तमानपत्र टाकण्याचे काम करत होते. देशाला महान वैचारिक वारसा देणाऱ्या महामानवाच्या आयुष्याची सुरुवात अतिशय खडतर होती.

शालेय शिक्षणात त्यांची कामगिरी चमकदार नव्हती, पण गणितामुळे ते फार पुढे गेले. पुढील उच्चशिक्षणातही त्यांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागले; परंतु त्यांवर मात करत ते प्रगतीच्या दिशेने झेपावतच राहिले. काहीतरी करण्याची प्रचंड ऊर्जा कलामांच्या ठायी होती. त्यामुळे 'स्वतःमध्ये शक्ती असेल तरच शक्तींची साथ मिळते' असे त्यांचे मानणे होते.

त्यांच्या ठायी एकाच वेळी प्रगल्भता आणि लहान मुलांची निरागसता होती. म्हणूनच तर देशातल्या प्रत्येक नवअंकुराशी ते नातं जोडू शकले. ज्या देशाची तरुण पिढी मनाने सशक्त असेल तो देश प्रगतीची उंच शिखरं गाठल्याशिवाय राहणार नाही. राष्ट्रपतिपदावर असताना आणि त्यानंतरही देशातल्या लहानग्यांच्या प्रत्येक सोहोळ्याला ते उत्स्फूर्तपणे उपस्थित राहीले, त्यांना मार्गदर्शन केलं, त्यांच्यात मिसळले. लहान मुलांची निरागसता जपता आली पाहिजे हे सांगताना ते म्हणतात, ''आता मला शालेय जीवनात दर वर्षी किती जास्त मार्क मिळाले हे आठवण्यापेक्षा मी मागल्या बाकावर बसून काय काय मजा केली हे आठवताना मन सुखावतं.''

शास्त्रज्ञ डॉ. अनिल काकोडकर याविषयीची एक आठवण सांगतात ती अशी, डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्याबरोबर भरपूर काम करण्याची संधी मला मिळाली. जेव्हा ते निवृत्त झाले त्या वेळेस मी त्यांना विचारले की, आता पुढे काय करणार? तेव्हा ते मला म्हणाले की, 'मी आता मुलांशी संवाद साधणार.' तेव्हा त्यांनी वर्षभरात एक लाख मुलांशी संवाद साधण्याचा संकल्प सोडला. यानंतर ते काही काळातच राष्ट्रपती झाले. तेव्हा मी पुन्हा त्यांच्या संकल्पाबाबत विचारले असता ते म्हणाले की, आता तर काम आणखी सोपे झाले. विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या पलीकडे जाऊन त्यांनी

या देशाला खूप काही दिले. डॉ. कलाम हे अत्यंत साधे आणि सर्वांशी मिळूनमिसळून वागणारे व्यक्तिमत्व होते. त्यामुळेच तर शिलाँग इथे व्याख्यानासाठी गेले असताना चहापानाच्या वेळी त्यांनी त्यांच्याबरोबर सतत उभ्या असणाऱ्या सुरक्षारक्षकाचीही चौकशी केल्याची आठवण तो सुरक्षारक्षक डोळ्यांत पाणी आणून सांगतो. 'तुम्ही माझ्यासाठी एवढे तास उभे असता. काहीतरी खाऊन घ्या' आणि त्यानंतर त्यांनी माझ्याशी हस्तांदोलन केले. एवढ्या मोठ्या व्यक्तीने अशा प्रकारे दखल घेऊन आभार व्यक्त करण्याची ही पहिलीच वेळ असल्याचे सुरक्षारक्षकाने सांगितल्याचे अनेकांनी वाचले असेल.

देशासाठी आपण चांगले करण्यास बांधील आहोत एवढीच एकमेव जाणीव त्यांच्या अंतरात सदैव असावी. कारण सत्ता मिळाली की संपत्तीचा हव्यास कोणालाच सुटलेला नाही. त्याला अपवाद म्हणजे डॉ. ए. पी. जे अब्दुल कलाम होत. एकदा रामेश्वरम् या त्यांच्या जन्मठिकाणाहून त्यांना भेटायला त्यांच्या कुटुंबातील ३५ जण दिल्लीत राष्ट्रपतिभवन येथे आले. तेथून जवळच्या काही स्थळांना भेटी देऊन आले. जेवढे दिवस सगळी मंडळी राष्ट्रपतिभवनात होती तेवढ्या दिवसांच्या खर्चाचा धनादेश कलाम यांनी राष्ट्रपतिनिधीत जमा केल्याचे डॉ. कलाम यांचे सचिव सांगतात. सत्तेवर राहूनही इतका निर्मळ अलिप्तपणा, एका संतवृत्ती व्यक्तीकडेच असू शकते याचे हे जिवंत उदाहरण आहे.

'देश २०२० च्या दिशेने झेपावत आहे. देशातील ५४ कोटी तरुण या बदलात सहभागी होण्यासाठी सज्ज आहेत. यात तुम्हीही सहभागी होऊ शकता. त्यासाठी प्रत्येक विद्यार्थ्याने किमान पाच वृक्ष लावावे,' असे कळकळीचे आवाहन डॉ. कलाम यांनी देशातल्या तरुण पिढीला केले.

राष्ट्रपतिपद भूषणवण्याआधी सुरुवातीच्या काळात भारतीय अवकाश कार्यक्रमाचे अध्वर्यू विक्रम साराभाई यांचा सहवास त्यांना लाभला. त्यानंतर जुलै १९८० मध्ये एसएलव्ही ३ हा प्रक्षेपक तयार करणाऱ्या प्रकल्पाचे ते संचालक होते. त्यांच्या परिश्रमातून भारत देश उपग्रह सोडू शकणाऱ्या देशांच्या पंक्तीत जाऊन बसला. अणुऊर्जा विभागाच्या मदतीने १९९८ मध्ये वाजपेयी सरकारच्या काळात पोखरण-२ अणुचाचण्यांत त्यांनी मोठी भूमिका पार पाडली. कलाम भारतात घडले आणि त्यांनी भारताला मोठे करण्याचा ध्यास घेतला. चेन्नई येथील अण्णा विद्यापीठात त्यांनी २००१ पासून अध्यापन केले.

त्यांची विंग्ज ऑफ फायर, इंडिया २०२०-अ व्हिजन फॉर न्यू मिलेनियम, माय जर्नी, इग्नायटेड माइंड्स ही पुस्तके लहान मुलांना तसेच तरुणपिढीला प्रेरणादायी ठरली. भारत एक महान महाशक्ती बनेल असं स्वप्न त्यांनी पाहिलं आणि त्यासाठी काय करता येईल याचं विवेचन 'इंडिया २०२०' या पुस्तकातून केलं.

एन्व्हिजनिंग एम्पॉवर्ड नेशन, डेव्हलपमेंट्स इन फ्लुइड मेकॅनिक्स अँड स्पेस टेक्नॉलॉजी, द ल्युमिनस स्पार्क्स, द लाइफ ट्री, मिशन इंडिया, चिल्ड्रेन आस्क कलाम, गायडिंग सोल्स, इन्डॉमिटेबल स्पिरिट अँड इन्स्पायरिंग थॉट्स ही पुस्तके त्यांनी लिहिली. वैज्ञानिक म्हणून त्यांना ३० विद्यापीठांच्या डॉक्टरेट मिळाल्या होत्या. पद्मभूषण (१९८१), पद्मविभूषण (१९९०) व भारतरत्न (१९९७) या मानाच्या सन्मानांनी त्यांना गौरवण्यात आलं. तसेच रामानुजन पुरस्कार, हुवर मेडल, इंदिरा गांधी राष्ट्रीय एकात्मता हे पुरस्कार त्यांना लाभले.

के. आर. नारायणन यांच्यानंतर ते २००२ ते २००७ या काळात देशाचे अकरावे राष्ट्रपती होते. कोणतीही राजकीय पार्श्वभूमी नसताना केवळ स्वतःची विद्वत्ता, देशाप्रती तळमळ या शिदोरीतून त्यांनी देशाचे सर्वोच्च मानाचे पद भूषवले. ही प्रत्येक जनसामान्यासाठी प्रेरणादायी अशीच घटना आहे. राष्ट्रपतिपदावर असताना, लोकांचे राष्ट्रपती हे आदराचे स्थान त्यांना प्राप्त झाले. अगदी गरीब कुटुंबात जन्म होऊनही त्यांनी देशातील एक प्रसिद्ध वैज्ञानिक व लोकप्रिय आदर्श व्यक्ती म्हणून

(पृष्ठ क्र. ३० वर)

स्वतःच्या मनगटावर विश्वास असणाऱ्याला दुसऱ्याच्या सामर्थ्याची भीती कधीच वाटत नाही आणि अशा सामर्थ्याला हरवण्याचे धाडस नियतीसुद्धा कधीच करत नाही.

# श्रीमान सुंदर वरुणराज

*वर्षाऋतूचे सुंदर वर्णन या लेखात केले आहे - संपादक*

रविवारचा दिवस. वाचनालय बंद. कातरवेळी खिडकीत बसले होते. ज्येष्ठ सरत होता. वर बघितलं तर कृष्णमेघांची धावपळ चालू होती. खरंतर ही कातरवेळ अधिक उदास करते. हुरहुर लावते. हळवं बनवते.

पण आजची ही सांज मात्र आगळीवेगळी जाणवत होती. वरुणराजाचे आगमन चराचराला पुलकित करत होते. तो वरुणराजा ढगांच्या ललकाऱ्यांचा स्वीकार करत, बिजलीनृत्याचा आस्वाद घेत वाऱ्यावर स्वार होऊन येत होता. त्या वरुणराजाच्या आगमनाचे कोण कौतुक!

मोर आनंदातिशयाने पुलकित होऊन पिसारा फुलवून थुईथुई नाचत होते. इंद्राने आपले सप्तरंगी इंद्रधनुष्य उघडले होते. पण ह्या कौतुकसोहळ्याला साजेसेच होते वरुणराजाचे कर्तृत्व. तो आला तोच मुळी मृद्‌गंधाची उधळण करीतच. येतायेताच त्याने डोंगरमाथ्यावर हिरव्यागार शाली पांघरल्या. पांढरीशुभ्र जानवी घालून ते जणू श्रावणीलाच तयार झाले. त्या वरुणराजाने वसुंधरेलाही हिरवागार बुट्टेदार भरजरी शालु नेसवला होता. या जलधारांनी वाराही सुखावला होता. अंगा-अंगाने शितल थंडावून चराचर सृष्टीला हसवत होता, खेळवत होता. डोलवत होता.

या वरुणराजाच्या आगमनाने बळिराजा अत्यंत सुखावला होता, आनंदला होता. कंबर कसून कामाला लागला होता आणि कसता कसता उस्फूर्तपणे गात होता...

''भल्लरीदादा भल्लरी ... देवावाणी शेत माझं
नवसाला पावलं ... कुबेराचं धन मला शेतात गावलं...''

ह्या वरुणराजाचे कर्तृत्व कसे आणि किती गावे? धरणीमातेला तो किती प्रकारांनी फुलवत होता. दान देत होता. ह्या वरुणराजाच्या जलधारांमध्ये किती प्रकारचे रंग होते. किती प्रकारचे गंध होते. किती प्रकारांनी जिव्हेला, रसवेला तृप्त करणाऱ्या चवी होत्या. रविराजाच्या किरणांनी कलाबुतीची जर लेवून या जलधारांनी अवघ्या सृष्टीला सजवले होते. जलअमृताची संजीवनी प्राशन केल्यामुळे अवघ्या जीवसृष्टीचे वर्षाराणीबरोबर तालसुरात नृत्यगान चालू होते.

ह्या वर्षाऋतूला कलावंताच्या प्रतिभेचे वरदान लाभले आहे आणि म्हणूनच की काय, तो सृर्जनशीलतेचे अनेकाअनेक आविष्कार साकार करतो आहे. हिरव्या कोंबातून धनधान्याची निर्मिती केली. नाना फळांतून रसामृत ओतले. कृष्णमेघ तर प्रियतमेचा दूतच झाला. त्याने तर जगाला वेडे केले.

रिमझिम पाऊस पडे सारखा ...
घन घन माला नभी दाटल्या कोसळती धारा ...
रिमझिम झरती श्रावणधारा...
श्रावणात घननिळा बरसला...
आला पाऊस

यांसारख्या अनेक अजरामर गीतरचनांसाठी कवीला उस्फूर्त स्फूर्ती दिली, अनेक लेखकांना लिहिते केले तर अनेक गायकांना गाते केले.

कोकणातल्या कौलारू घरांना पागोळ्या लावल्या. ठिकठिकाणचे निर्झर, धबधबे नवचैतन्याने हसतखेळत

---

स्वतःच्या वाट्याला जरी काटे आले असले, तरी दुसऱ्याला गुलाबाची सुंदर फुले देता येतात.

लता-वेलींबरोबर फुगड्या घालत, डोंगरकपारीतून उड्या मारत, मूर्तिमंत उत्साहाने धावू लागले. नद्यांना वरुणराजाने भरभरून जलसंपत्ती दिली. त्यामुळे तृप्त होऊन त्यांनी ''सुजलाम् सुफलाम् सस्यश्यामलाम्'' चा मंत्र जागवला. कणसा-कणसांत दूध भरलं, तांदूळ-गव्हाच्या लोंब्या फुलवल्या, उसाला साखर दिली. गाय-वासरांना चारा दिला. काळ्या आईला पाचू, माणिक, मोत्यांनी सजवले. त्यामुळे बळि - राजाला त्या बहरलेल्या कणसांत सावळ्या पांडुरंगाचं रूप दिसू लागलं. अन् रिमझिमत्या पावसात तो निघालाच की डोक्यावर तुळशीवृंदावन घेऊन, ज्ञानबा तुकारामचा ताल धरत पंढरीच्या वारीला जात. खेड्यातल्या कौलारू घरा - घरांतून श्रमदेवीची आराधना, उपासना करत, घामाचे मोती गाळत वरुणराजाने दिलेल्या धनदौलतीला जपलं, जोपासलं जातं.

ह्याच वर्षाऋतूच्या आरंभी शाळा-कॉलेजच्या नवीन जीवनाला सुरुवात होते. नवीन पावसाच्या थंडगार उल्हसित करणाऱ्या वातावरणाने नव्या कोऱ्या पुस्तक वह्यांच्या वासात सर्वच नवनवलाईची अनोखी अनुभूती, ''जिंदगीभर नहीं भूलेंगे ये बरसात की रात...' अशा फुलपंखी, स्वप्निल उत्स्फूर्त उत्साहाने नवथर यौवनाची सुरुवात होते ती ह्याच बरखाराणीच्या साक्षीनं. हाच पाऊस तारुण्याला अनामिक हुरहुर लावतो. हाच पाऊस ''या कातरवेळी पाहिजेस तू जवळी'' ... ची ओढ लावतो आणि हाच पाऊस ''कुणास्तव कुणीतरी'' च्या येरझाऱ्या करावयास लावतो.

ह्याच पावसात गरमागरम कांदाभजी, बटाटेवडे, आल्याचा चहा ह्यांची जिव्हेला तहान लागते आणि हाच वरुणराजा श्रावण-भाद्रपदात घराघरात-मनामनात मांगल्याचे दीप उजळीत येतो आणि त्याच वेळेला आनंदी-आनंदी गडेच्या उत्साहाला, धार्मिक सणांच्या उत्साहाचे अधिष्ठान देऊन तो त्या सर्वात्मक सर्जनशील सर्वेश्वराच्या विविध रूपांची अनेक रंगांची, अनेक गंधांची फुले वाहून, पूजा करून त्याचेच त्याला अर्पण करतो.

असं हे वरुणदेवाचं रूप मनमोहक आहे. पाणी म्हणजे जीवन आहे. ते नसेल तर सर्व जीवन निरस होईल, शुष्क, रूक्ष होईल. पाण्यासाठी दाही दिशा फिराव लागतं. शेतकऱ्यांना बलिदान करावं लागतं. बिजलीताई आखडून बसतात.

तर असा हा पाऊस किती उपकारक. सर्व जीवसृष्टीचे जीवनच त्याच्यावर अवलंबून. तो कमी पडला, वेळेवर आला नाही तर त्याला लाखोलीही खावी लागते.

पण तो स्वतंत्र आहे. स्थितप्रज आहे. त्याचे कर्तव्यकर्म तो करत राहतो. हं! पण एकदा का तो फिरला तर मात्र तो कोणाला ऐकणार नाही. न भूतो न भविष्यति असे रौद्र रूप धारण करतो आणि जे उत्पात घडवितो ते अवघ्या जीवसृष्टीला त्राही भगवान म्हणून सळो की पळो करून सोडतो. सुतासारखा सरळ असेल तेव्हा मातेच्या वात्सल्याने अवघ्या जीवसृष्टीला आंजारेल, गोंजारेल, मुखी अमृत घालून संजीवन देईल; पण जर का लहर फिरली तर तोंडचं पाणी पळवेल, हातातोंडाशी आलेला घास काढून घेईल, आपल्या साथ संगतीला समीर, सरिता, सागर यांनाही घेईल आणि मग जे काही तांडवनृत्य करील की जो अवघ्या जीवसृष्टीला तारक होता, संजीवक होता, तोच मारक होतो, विध्वंसक होतो. अवघे जीवनच उद्ध्वस्त करून जातो.

तर अशी ही वरुणराजाची दोन रूपं. राजाच तो. त्याला कोण जाब विचारणार? आणि कोण काय सांगणार?

तो कर्ण होईल तेव्हा ओंजळ भरुन घ्यायचं आणि दुर्योधन होईल तेव्हा मुकाट्याने सहन करायचं एवढंच आहे आपल्या हातात.

**शैलजा बेडेकर**
मनोरंजन वाचनालय,
ठाणे

संस्कृती म्हणजे आपल्या मनावर ताबा व दुसऱ्याच्या दुःखाची जाणीव होय.

# भारतीय चित्रपटसृष्टीचे 'चित्रपती' : व्ही. शांताराम

*भारतातील ज्येष्ठ चित्रपटनिर्माते, दिग्दर्शक व अभिनेते शांताराम वणकुद्रे उर्फ व्ही. शांताराम यांच्याविषयी माहिती देणारा लेख - संपादक*

भारतीय सिनेमाचा इतिहास अतिशय रंजक आहे. भारतामध्ये चित्रपटनिर्मितीची मुहूर्तमेढ रोवण्याचा मान दादासाहेब फाळके या मराठी माणसास जातो. दादासाहेब फाळके यांनी भारतातील पहिला चित्रपट बनवून तो इसवी सन १९१३ मध्ये प्रदर्शित केला. या चित्रपटाचे नाव 'राजा हरिश्चंद्र' असे होते व हा मुकपट होता. दादासाहेब फाळके यांना त्यामुळेच भारतीय चित्रपटसृष्टीचे जनक म्हटले जाते. दादासाहेब फाळके यांचे पूर्ण नाव धुंडिराज गोविंद फाळके असे होते, मात्र ते दादासाहेब फाळके या नावानेच प्रसिद्ध होते. त्यांचा जन्म ३० एप्रिल १८७० रोजी नाशिक जिल्ह्यातील त्र्यंबकेश्वर येथे एका चितपावन ब्राम्हण कुटुंबात झाला. त्यांचे वडील संस्कृत पंडित होते. फाळक्यांनी मुंबईस्थित सर जे. जे. स्कूल ऑफ आर्टस्‌मध्ये इसवी सन १८८५ मध्ये प्रवेश घेतला. १८९० मध्ये तेथून शिक्षण पूर्ण करून ते बडोद्याला गेले व तेथील कला भवनातून शिल्पकला, अभियांत्रिकी आराखडा, चित्रकला व छायाचित्रणाचे प्रशिक्षण घेतले. फाळक्यांनी 'राजा हरिश्चंद्र' नंतर 'श्रीकृष्ण जन्म', 'कालिया मर्दन', 'सेतू बंधन', 'गंगावतरण' इत्यादी चित्रपट बनवले. यांतील बहुतांशी चित्रपट मूकपट होते.

दादासाहेब फाळके यांची चित्रसृष्टीतील वाटचाल चालू असतानाच इसवी सन १९१९ मध्ये बाबूराव मेस्त्री यांनी - ज्यांना बाबूराव पेंटर या नावानेदेखील ओळखले जाते - कोल्हापूर संस्थानच्या महाराजांच्या आशीर्वादाने 'महाराष्ट्र फिल्म कंपनी' ची स्थापना केली व इसवी सन १९२० साली 'सैरंध्री' हा मूकपट बनवला. बाबूराव पेंटरांनी १९३० सालापर्यंत अनेक चित्रपट बनवले व कालांतराने महाराष्ट्र फिल्म कंपनी बंद पडली.

व्ही. शांताराम यांनी याच महाराष्ट्र फिल्म कंपनीतून आपल्या चित्रपटसृष्टीतील कारकिर्दीची सुरुवात केली. त्यांचा जन्म १८ नोव्हेंबर १९०१ रोजी कोल्हापूर संस्थानात झाला. त्यांच्या वडिलांचे संपूर्ण नाव राजारामबापू बाबाजी वणकुद्रे तर आईचे नाव कमलाबाई हे होते. वणकुद्रे ह्या आडनावातील व्ही. (V) ह्या इंग्रजी आद्याक्षरावरूनच नंतरच्या काळात शांतारामबापूंचे व्ही. शाताराम हे नाव पडले व सिनेसृष्टीत प्रसिद्ध झाले. त्यांना चित्रपटसृष्टीत आदराने 'अण्णासाहेब' म्हणूनदेखील संबोधले जात असे.

शांतारामबापूंच्या लहानपणी त्यांच्या घरची परिस्थिती बेताचीच होती. त्यांचे वडील दुकानदारीसारखे लहानमोठे उद्योग करत असत. काही काळ राजारामबापूंनी हुबळी (कर्नाटक) येथे हॉटेलदेखील काढले होते. हे हॉटेल बऱ्यापैकी चालत असताना तेथील आचारी भांडण करून निघून गेला. अशा बाक्याप्रसंगी आपल्या मुलांच्या तोंडचा घास जाईल व राजारामबापूंना त्यांच्या चांगुलपणाने जो कर्जाचा डोंगर झाला होता ते कर्ज फेडण्यास त्रास होईल म्हणून अण्णांच्या मातोश्री कमलाबाईंनी स्वतः कंबर कसून खाण्यापिण्याचे जिन्नस बनविण्यास सुरुवात केली व हॉटेल बंद पडू दिले नाही. हुबळी येथे शांतारामबापूंनी रेल्वेच्या वर्कशॉपमध्ये फिटर म्हणून नोकरी पत्करली व तेथेच त्यांच्या हाताच्या बोटांना इजा झाली होती.

शांतारामबापूंनी चित्रपटसृष्टीत प्रवेश करण्यापूर्वी गंधर्व नाटक कंपनीमध्ये काम केले होते. नाटक कंपनीत

काम करत असताना त्यांचा राम गणेश गडकऱ्यांसारख्या महान नाटककारासोबत संबंध आला होता. एकदा राम गणेश गडकऱ्यांनी शांतारामबापूंना आपल्या घरी जेवायला बोलावले. शांतारामबापूंच्या समोर ताट वाढून आल्यावर त्यांना दिसले की, ताटात 'मटणाची' भाजी आहे. बापू तर पक्के शाकाहारी असल्यामुळे त्यांची मोठी अडचण झाली. त्या वेळी गडकऱ्यांच्या आईने ताबडतोब ताट बदलून त्यांना शाकाहारी जेवण वाढले. शांतारामबापूंचा १९१४-१५ या कालावधीत गंधर्व नाटक कंपनीशी संबंध होता.

गंधर्व नाटक कंपनी सोडल्यानंतर अण्णांनी हुबळीला काही दिवस काढले व वर नमूद केल्याप्रमाणे फिटरची नोकरी केली. त्याचप्रमाणे तेथेच ते फोटोग्राफीची कलादेखील शिकले. शांतारामबापूंचा महाराष्ट्र फिल्म कंपनीत प्रवेश होण्यास त्यांचे मावसभाऊ बाबूराव पेंढारकर कारणीभूत ठरले. ते महाराष्ट्र फिल्म कंपनीच्या बाबूराव पेंटरांनी काढलेल्या 'सैरंध्री' या मूकपटाचा खेळ दाखविण्यासाठी डेक्कन सिनेमात आले असताना शांतारामबापूंनी पेंढारकरांना महाराष्ट्र फिल्म कंपनीत काम मिळेल का अशी विचारणा केली होती. बाबूराव पेंढारकर हे तेव्हा महाराष्ट्र फिल्म कंपनीत मॅनेजर (व्यवस्थापक) म्हणून सेवेत होते. बाबूराव पेंढारकरांच्या शिफारशीवरून बाबूराव पेंटरांनी शांतारामबापूंना आपल्या कंपनीत नोकरीस ठेवून घेतले. मात्र प्रश्न होता की, नेमकं काम काय करावं, तेव्हा बाबूराव पेंढारकरांच्या सल्ल्यामुळे ते कंपनीतील 'हरेक' (प्रत्येक) काम करू लागले. थोडक्यात जेथे-जेथे कामाची आवश्यकता असेल व जे काम करण्यासाठी एखाद्यास मदतीची गरज असेल व कुठलेही काम अपूर्ण असल्यास ते पूर्णत्वास न्यावयाचे असेल अशी विविध कामे ते करू लागले. एवढेच नव्हे, तर बापूंनी सिनेमातंत्रातील सर्वच खात्यांमध्ये काम केले व आज्ञाधारक विद्यार्थ्याप्रमाणे, दिग्दर्शन, छायाचित्रण, लिखाण इत्यादी गोष्टी आत्मसात केल्या. त्यांनी झाडू मारण्यासारख्या कामालासुद्धा कमी लेखले नाही. त्यामुळेच अण्णा महाराष्ट्र फिल्म कंपनीत २० जून १९२० रोजी 'हरकाम्या' म्हणून रुजू झाले असे म्हणणे वावगे ठरणार नाही.

अशा तऱ्हेने शांतारामबापू महाराष्ट्र फिल्म कंपनीत कार्यरत असताना अभिनय, चित्रीकरणाचा कॅमेरा चालवणे / हाताळणे, चित्रपटाचे संकलन व दिग्दर्शन या सर्वांचे अगदी जवळून निरीक्षण करत होते व शिकत होते. त्यांनी या वेळी कंपनीच्या अनेक चित्रपटांत भूमिकादेखील साकारल्या होत्या.त्यांनी महाराष्ट्र फिल्म कंपनीत असताना 'नेताजी पालकर' हा चित्रपट दिग्दर्शित केला व खऱ्या अर्थाने दिग्दर्शन क्षेत्रातील पदार्पण केले असे म्हणणे वावगे ठरणार नाही, कारण कंपनीचे एक भागीदार सरदार नेसरीकर यांच्या सांगण्यावरून या चित्रपटाची दिग्दर्शनासह सर्व सूत्रे बापूंनी आपल्या हातात घेतली होती व बाबूराव पेंटरांचा या चित्रपटाच्या निर्मितीत तसा हातभार नव्हता. शांतारामबापूंनी एवढ्या लहान वयात 'नेताजी पालकर' सारख्या ऐतिहासिक चित्रपटाचे दिग्दर्शन स्वतःच्या खांद्यावर घेऊन ते तडीस नेणे व चित्रपट यशस्वी करून दाखवणे ह्या गोष्टी कदाचित बाबूराव पेंटरांना रुचल्या नसतील. त्यामुळे ह्या घटनेनंतर दोघांमधील दुरावा वाढत गेलेला दिसतो व कालांतराने बापूंनी महाराष्ट्र कंपनी सोडलेली दिसते.

१ जून १९२९ रोजी शांतारामबापूंनी महाराष्ट्र फिल्म कंपनीतीलच केशवराम धायबर, विष्णुपंत दामले व शेख फत्तेलाल यांच्यासह कोल्हापूर येथे 'प्रभात फिल्म कंपनीची' स्थापना केली. याच प्रभात फिल्म कंपनीने बापूंच्या दिग्दर्शनाखाली 'गोपालकृष्ण', 'खूनी खंजर'(हिंदी), 'उदयकाल', 'चंद्रसेना', 'अयोध्येचा राजा' (हिंदीत - अयोध्या का राजा), 'जलती निशानी' (हिंदी), 'अग्निकंकण' (मराठी), 'माया मच्छिंद्र', 'सिंहगड', 'सैरंध्री', 'अमृतमंथन', 'धर्मात्मा', 'अमर ज्योती', 'माणूस', 'शेजारी' इत्यादी अनेक चित्रपट निर्मित केले व प्रभात फिल्म कंपनीच्या तुतारीचा (एक सुंदर स्त्री प्रभातसमयी तुतारी वाजवून सूर्यनारायणाचे जणू स्वागत करत आहे अशा आशयाचे प्रभात फिल्म कंपनीचे

'बोधचिन्ह' होते) आवाज संपूर्ण भारतात दुमदुमला. एवढेच नव्हे तर शांतारामबापूंनी यांतील जवळजवळ सर्वच चित्रपट आर्थिकदृष्ट्या यशस्वी करून दाखवले व चित्रपट अतिशय विचार करून सामाजिक वा देशासंबंधीचा वा आपल्या संस्कृतीशी नात सांगणारा विषय निवडून कल्पकतेने दिग्दर्शित केला तर तो तिकीटबारीवर गर्दी खेचून निर्मात्याने गुंतवलेले भांडवल परत मिळवून देतो व नफादेखील कमावतो हे सिद्ध करून दाखवले. शांतारामबापूंनी आपल्या दिग्दर्शनाची व संकलनाची विशेष छाप प्रभातच्या 'गोपालकृष्ण' या पहिल्या चित्रपटातूनच दाखवायला सुरुवात केली. याचे उदाहरण म्हणजे या चित्रपटातील एका प्रसंगातील श्रीकृष्णाच्या एका लहान सवंगड्याची नाचत-बागडत असताना सुटलेली लंगोटी हे होय. वाचकांनी या प्रसंगाच्या चित्रीकरणाचा व नंतर संकलन करतानाचा व बापूंनी हा प्रसंग चित्रपटात कसा ठेवला (न कापता) व चित्रपट पाहिल्यानंतर प्रेक्षकांनी या प्रसंगास हशा व टाळ्यांच्या रूपात दिलेला उत्स्फूर्त प्रतिसाद हे जाणून घेण्यासाठी बापूंनी लिहिलेल्या 'शांतारामा' या त्यांच्या आत्मचरित्रातील पृष्ठ क्रमांक ९८, ९९ व १०० वरील मजकूर जरूर वाचावा.

शांतारामबापूंनी १९३३ च्या नोव्हेंबर महिन्यात प्रभात फिल्म कंपनीचे कोल्हापूरहून पुण्यास स्थलांतर केले. त्यासाठी त्यांनी पुण्यात एक मोठी जागा घेतली होती. १९३४ पासून खऱ्या अर्थाने 'प्रभात स्टुडिओत' चित्रपट निर्मितीस सुरुवात झाली असे म्हणणे वावगे ठरणार नाही. येथेच बापूंनी आपल्या आई-वडिलांचे स्वतःचे घर असण्याचे स्वप्न पूर्ण केले व त्यांच्यासाठी 'राजकमल' हा बंगला बांधला. असे म्हटले जाते की, कुठल्याही चांगल्या गोष्टीस दृष्ट लागते. त्याप्रमाणेच प्रभात फिल्म कंपनीलादेखील ती लागली. बापू आपल्या दिग्दर्शन कौशल्याने एकापाठोपाठ दर्जेदार चित्रपट काढून यशस्वी करत होते व कंपनीची भरभराट होत होती. मात्र, याच वेळी कंपनीच्या भागीदारांमध्ये मानसिक दुरावा वाढत होता.

१९३६ साली केशवराव धायबरांनी प्रभात फिल्म कंपनी सोडली व शांतारामबापूंनादेखील १३ एप्रिल १९४२ रोजी प्रभात फिल्म कंपनी सोडावी लागली. त्या वेळी त्यांना स्वतःच्या मेहनतीने व अतिशय कष्टाने आपल्या पोटच्या मुलाप्रमाणे वाढविलेल्या व भरभराटीस आणलेल्या आपल्या आवडत्या प्रभात फिल्म कंपनीला नव्हे, त्यांच्या स्वतःच्या अपत्याला सोडताना काय दुःख झाले असेल याची आपण कल्पना करू शकतो.

एक गोष्ट पक्की की, शांतारामबापू हाडाचे कलाकार व त्यांनी स्वतःला चित्रपटसृष्टीस खऱ्या अर्थाने वाहून घेतले होते. त्यामुळे प्रभात फिल्म कंपनी सोडल्यानंतर पुढे काय, असा प्रश्न त्यांच्या मनात उभाच राहिला नाही कारण उत्तर नेहमी एकच असणार होते ते म्हणजे नवीन फिल्म कंपनी व पुन्हा एकदा स्वबळावर दर्जेदार चित्रपटांची निर्मिती व दिग्दर्शन. त्यामुळे शांतारामबापूंनी प्रभात फिल्म कंपनीतून बाहेर पडल्यानंतर आपले बस्तान मुंबईला हलविले व ९ नोव्हेंबर १९४२ रोजी 'राजकमल कला मंदिर' या चित्रपटसंस्थेची स्थापना केली व या संस्थेच्या नावाखाली 'शकुंतला', 'परबत पे अपना डेरा', 'डॉक्टर कोटनीस की अमर कहानी', 'अपना देश', 'दहेज', 'अमर भूपाळी', 'परछाई', 'तीन बत्ती चार रास्ता', 'सुबह का तारा', 'सुरंग', 'झनक झनक पायल बाजे', 'दो आँखे बारह हाथ', 'नवरंग' इत्यादी दर्जेदार हिंदी व मराठी चित्रपट निर्माण केले. शांतारामबापूंनी यासोबतच 'गीत गाया पत्थरोंने' (ह्या चित्रपटातून १९६५ साली रवी कपूर उर्फ जीतेंद्र याचे खऱ्या अर्थाने हिंदी चित्रपटसृष्टीत पदार्पण घडवून आणणे म्हणणे वावगे ठरणार नाही. कारण या चित्रपटात त्याला पहिल्यांदा प्रमुख भूमिका करण्यास मिळाली. तो या चित्रपटाचा नायक होता व नायिकेचे काम बापूंची कन्या व नंतरच्या काळातील हिंदी चित्रपटसृष्टीतील आघाडीची नायिका राजश्री हिने केले होते), 'जल बिन मछली नृत्य बिन बिजली', 'पिंजरा' इत्यादी चित्रपटदेखील निर्माण केले.

बापूंनी आपल्या प्रदीर्घ कारकिर्दीत समाजाभिमुख

कशाततरी रमून गेल्याशिवाय माणूस सुखी होऊ शकत नाही. - वि. स. खांडेकर

चित्रपट काढण्यावर भर दिलेला आढळतो व त्यांच्या प्रत्येक चित्रपटाचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांनी चित्रपट माध्यमाचा समाजातील लोकांना काही ना काही संदेश देण्यासाठी पुरेपूर वापर केलेला दिसतो. त्यांनी मूकपट, बोलपट, कृष्णधवलपट, रंगीतपट अशा विविध प्रकारच्या चित्रपटांची निर्मिती केली. त्याचप्रमाणे त्यांनी अनेक लघुपट व बालचित्रपट बनविलेले आढळतात. त्यांनी चित्रपटसृष्टीत अत्यंत मानाचे समजले जाणारे फिल्म प्रोड्यूसर्स गिल्डचे अध्यक्षपद, मराठी चित्रपट महामंडळाचे अध्यक्षपद व चित्रपटक्षेत्राशी निगडित इतर अनेक सरकारी व बिगर सरकारी संस्थांचे अध्यक्ष वा सदस्यपद भूषविले होते. त्यांनी चित्रपटक्षेत्रातील महत्त्वाची स्थित्यंतरे जवळून पाहिली व अनुभवली तसेच अनेक कलाकारांना, तंत्रज्ञांना व संगीत दिग्दर्शकांना संधी देऊन पुढे आणले.

शांतारामबापूंना आपल्या आई व वडिलांविषयी विशेष लळा होता. त्यामुळे ३१ डिसेंबर १९६२ रोजी जेव्हा राजारामबापूंचे (वडील) निधन झाले तेव्हा अण्णांना खूप दुःख झाले व त्यानंतर अवघ्या नऊ महिन्यांनी ५ सप्टेंबर १९६३ रोजी कमलाबाईंचे (मातोश्री) निधन झाले. तेव्हा 'मी पोरका झालो' असे व ''बापू वारले त्यावेळी मला खूप दुःख झालं, पण आई गेली तेव्हा मात्र मी अनाथ झालो असंच मला वाटलं.'' असे आपल्या आत्मचित्रात नमूद केले आहे. शांतारामबापूंनी चित्रपटसृष्टीतील अनेक गरजवंतांना मदत केलेली आहे. भारतीय चित्रपटसृष्टीचे जनक दादासाहेब फाळके यांनादेखील त्यांच्या बिकट समयी त्यांनी आर्थिक मदत दिली होती. फाळक्यांसारख्या चित्रमहर्षींना ते काहीतरी मदत करू शकले याची त्यांना धन्यता वाटली होती.

अशा या महान चित्रपटकाराची दोन महत्त्वाची स्वप्ने होती व ती म्हणजे महात्मा गांधीच्या जीवनावर चित्रपट काढणे व महाभारतानंतरच्या काळापासून ते २० व्या शतकापर्यंत भारतात जी सामाजिक व राजकीय स्थित्यंतरे घडली ती दाखवणारी चित्रपटमालिका निर्माण करणे. त्यांनी या चित्रपटमालिकेस 'उत्तर-महाभारत' असे नाव देण्याचे ठरवले होते.

शांतारामबापूंनी आपल्या कुटुंबावर भरभरून प्रेम केले व विनोदाने त्यांनी म्हटले आहे की, त्यांच्या मुलांमुळे ते आंतरप्रांतीय व अगदी आंतरराष्ट्रीय सासरेदेखील झाले. त्यांच्या मुलांनी विविध प्रांतांतील व दुसरी भाषा बोलणारे जोडीदार निवडले व राजश्रीने तर ग्रेगरी चॅपमन या अमेरिकन तरुणासोबत विवाह केला म्हणून त्यांनी आपल्या आत्मचरित्रात वरील विनोदात्मक उल्लेख केला आहे व त्याची पार्श्वभूमी म्हणजे त्यांचा 'तीन बत्ती चार रास्ता' ह्या चित्रपटाचे कथानक होय. बापूंनी त्यांचे पुत्र प्रभातकुमार व किरणचंद्र शांताराम यांना चित्रपट दिग्दर्शित करण्याची संधीदेखील दिली होती. त्याप्रमाणे प्रभातकुमारांनी 'तूफान और दिया' (हिंदी) तर किरण शांतारामांनी 'झुंज' (मराठी) या चित्रपटांचे दिग्दर्शन केलेले आढळते. किरण शांतारामांनी १९८० च्या दशकात 'अशी ही बनवाबनवी' या अतिशय विनोदी मराठी चित्रपटाची निर्मितीदेखील केली होती.

सध्या किरण शांताराम चित्रपट रसास्वादाच्या चळवळीत सक्रिय असून चित्रपटाचा आस्वाद घेणारे प्रगल्भ प्रेक्षक निर्माण करणे यासाठी ही चळवळ कार्यरत आहे. या चळवळीची सुरुवात भारतातील नावाजलेले चित्रपटकार सत्यजित रे यांनी खऱ्या अर्थाने केली असे म्हणणे वावगे ठरणार नाही. ही चळवळ पुढे नेण्यासाठी व जनमानसात तिचा प्रसार करण्यासाठी फेडरेशन ऑफ फिल्म सोसायटीज् ऑफ इंडिया (Federation of Film Societies of India) या संस्थेचीदेखील स्थापना करण्यात आली होती व सत्यजित रे यांनी त्याचे अध्यक्षपद भूषविले होते. हिंदी सिनेजगतातील दिग्गज दिग्दर्शक श्याम बेनेगल हेदेखील या संस्थेचे अध्यक्ष होते व सध्या किरण शांताराम या संस्थेचे अध्यक्षपद भूषवीत आहेत. या अनुषंगाने येथे सांगण्यास अभिमान वाटतो की, विद्या प्रसारक मंडळाच्या जोशी-बेडेकर कला व वाणिज्य महाविद्यालयात इसवी सन २००७ मध्ये विद्या प्रसारक मंडळाचे कार्याध्यक्ष

डॉ. विजय बेडेकर यांच्या पुढाकाराने जोशी-बेडेकर महाविद्यालय फिल्म सोसायटीची (Joshi-Bedekar College Film Society) स्थापना झाली व ही संपूर्ण महाराष्ट्रातील फेडरेशन ऑफ फिल्म सोसायटीज्‌ या संस्थेला संलग्नित असलेली महाविद्यालयांतील पहिली फिल्म सोसायटी ठरली आहे. जोशी-बेडेकर महाविद्यालय फिल्म सोसायटीच्या उद्‌घाटनप्रसंगी किरण शांताराम, श्याम बेनेगल व प्रसिद्ध चित्रपटसमीक्षक सुधीर नांदगावकर आले होते. अशा तऱ्हेने किरण शांताराम, त्यांचे पिताश्री व्ही. शांताराम उर्फ शांतारामबापू उर्फ अण्णासाहेब यांचा वारसा समर्थपणे चालवत आहेत.

व्ही. शांतारामांना ‘चित्रपती’ ही उपाधी देण्याचे श्रेय आचार्य अत्र्यांना जाते. त्यांनी शांतारामबापूंच्या सन्मानार्थ मुंबईतील शिवाजीपार्क येथे भरलेल्या सभेत ‘‘आमच्या ज्ञानोबापासून विनोबापर्यंत व छत्रपती शिवाजीपासून चित्रपती शांतारामपर्यंत सर्वांनी महाराष्ट्रास मोठ्या उच्च स्थानावर नेऊन ठेवलंय!’’ हे उद्‌गार काढले व बापू म्हणतात, तेव्हापासून त्यांच्या नावापुढे ‘चित्रपती’ ही उपाधी लागली.

व्ही. शांतारामांच्या चित्रपट कारकिर्दीचा आढावा घेण्यास हजारो पानंदेखील पुरणार नाहीत, एवढे त्यांचे उत्तुंग योगदान आहे. देवाने त्यांना चित्रपटक्षेत्रात जसे उदंड यश दिले तसेच उदंड आयुष्यदेखील दिले. अशा या महान कलाकारचे निधन वयाच्या ८९ व्या वर्षी दिनांक ३० ऑक्टोबर १९९० रोजी झाले. सरतेशेवटी एवढेच म्हणावेसे वाटते की, भारतीय चित्रपटसृष्टीच्या या ‘चित्रपतीचे’ स्थान भारतीयांच्या हृदयात व मनात कायम राहील.

**संदर्भ**

शांतारामा- व्ही. शांताराम (संकल्पना, शब्दांकन -मधुरा जसराज)
मराठी विश्वकोश - भाग - १७

**साहा. प्राध्यापक सुभाष गं. शिंदे**
उपप्राचार्य व इतिहासविभाग प्रमुख
जोशी-बेडेकर महाविद्यालय, ठाणे.

(पृष्ठ क्र.२३ वरून **स्वप्नांना पंख देणारे डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम**)

लोकांच्या मनात आदराचे स्थान मिळवले. एक वैज्ञानिक देशाचा राष्ट्रपती बनण्याची ती पहिली वेळ होती.

लोकांसाठी उपयोगी पडेल असे संशोधन झाले पाहिजे असे त्यांचे मत होते. त्यांना संगीताची खूप आवड होती. सरस्वतीची कृपा असलेले डॉ. कलाम हे उत्तम वीणावादक होते. त्यांना कर्नाटकी संगीतात विशेष रस होता.

त्यांच्या घरात त्यांनी सौरशक्तीवर चालणारे दिवे बसवले होते. कारण सकाळी उठून नमाज पढणाऱ्या वयस्कर भावाला उजेडात नीट दिसावे असा हेतू होता. कारण त्यांच्या गावात अजूनही वीज नाही. त्यांच्या घरात एक पुस्तकांचे वाचनालय होते. त्यांचे घर हा अनेक प्रयोगांचा एक आरंभबिंदू होता. तिथून निपजणाऱ्या शक्तिस्रोताने अवघ्या देशाच्या कल्याणाचा ध्यास घेतला आणि बऱ्याच अंशी त्याची पूर्तताही केली. देशाला एका नव्या स्वप्नाच्या दिशेने झेपावण्याचे बळ दिले. नवपिढीच्या मनात प्रगतीचे अंकुर रुजवले. अशा महान आधुनिक विज्ञानऋषींच्या महानिर्वाणाने एक निर्वात पोकळी निर्माण झाली आहे. कार्यरत असताना वयाच्या ८३ व्या वर्षी देशाच्या लाडक्या सुपुत्राने सगळ्यांचा निरोप घेतला. अशा कर्तृत्ववान डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांना कोटी कोटी प्रमाण!

संदर्भ : १) माझी जीवनयात्रा
२) अग्निपंख
३) भारत २०२० - नव्या सहस्त्रकाचा भविष्यवेध
४) प्रज्वलित मने
५) ए. पी. जे. अब्दुल कलाम - एक व्यक्तिवेध - रामनाथन्‌ आर.

**प्रा. संतोष लक्ष्मण राणे**
मराठी विभाग,
जोशी-बेडेकर महाविद्यालय,
ठाणे

‘आपण काय आहोत’ यावरून आपली किंमत ठरते; ‘आपल्याकडे काय आहे’ यावरून नव्हे.

# गुरुपौर्णिमा

*गुरूचे माहात्म्य या लेखात सांगण्यात आले आहे - संपादक*

सात समुंदर की मसी करी
लेखनी सब बनराई
धरती सब कागज करी
गुरु गुन लिखा न जाई ॥

संत कबिरांनी गुरूचे माहात्म्य किती छान शब्दांत वर्णन केलंय - सात समुद्रांची शाई, सर्व झाडांच्या लेखण्या आणि धरित्रीचा कागद केला तरी गुरूचे गुण लिहिता येत नाहीत. हा दोहा आठवण्याचं कारण म्हणजे आजची गुरुपौर्णिमा !

आषाढ पौर्णिमेला व्यासपूजा करण्याची प्रथा आहे. व्यासमहर्षी हे शंकराचार्यांच्या रूपाने पुन्हा अवतीर्ण झाले अशी भाविकांची श्रद्धा आहे. तेव्हा संन्यासी लोक त्या दिवशी व्यासपूजा म्हणून शंकराचार्यांची पूजा करतात. इतर शिष्यही या दिवशी आपल्या गुरूंची पूजा करतात.

'गुरू' या शब्दाच्या व्याख्याही किती सांगता येतील? तसेच या शब्दाचे अर्थही अनेक आहेत. आचार्य, उपाध्याय, ज्येष्ठ, श्रेष्ठ, उपदेशक इ. अर्थांसोबतच

गिरत्यज्ञानमिति - अज्ञान दूर करतो तो 'गुरू'
गृणाति धर्ममिती - धर्माचा उपदेश करतो तो 'गुरू'
गीर्यते इति - ज्याचे स्तवन केले जाते तो 'गुरू'

तसेच मनूने गुरूचे लक्षण सांगताना म्हटले आहे - निषेक (गर्भाधान), पुंसवन, जातकर्म, उपनयन इ. कर्मे यथाविधि करणारा (अर्थात पिता) व अन्नदानाने पालनपोषण करणारा विप्र, गुरू म्हटला जातो.

पिता हा पुत्राला केवळ जन्म देतो, तर गुरू त्याची जन्ममरणातून सुटका करतो म्हणून पित्यापेक्षाही गुरूला श्रेष्ठ मानले आहे. त्यालाच शिष्याचा 'आध्यात्मिक पिता' मानलं गेलंय.

'गुरू' शब्दातला गकार हा सिद्धी देणारा, रकार हा पापहारक व उकार हा अव्यक्त विष्णू आहे. म्हणजेच 'गुरू' हा वरील तिन्ही गोष्टींचा समावेशक असलेला असा व श्रेष्ठ आहे. 'गुरू' गीतेमध्ये 'गुरू' या शब्दाची फार सुंदर व्याख्या सांगितली आहे.

गुः शब्दस्तु अंधकारः
रु शब्दस्तं निरोधकः

पहिलं अक्षर हे अंधकारवाचक आहे तर 'रु' हे अक्षर अंधकाराचं निवारण करणारं आहे. म्हणूनच अंधकाराचा नाश करुन प्रकाश देतो तो 'गुरु'!

गुरू ही पूर्वी एक पारमार्थिक संस्था होती आणि अजूनही आहे. जे कोणी परमार्थविचारात पडतात त्यांना 'गुरू' हवाच हवा, असे अनेक संतांनी प्रतिपादिलेले आहे. किंबहुना कोणी केवढाही जरी संत असला तरी त्याला जर गुरूपदेश झालेला नसला तर तो कच्याच राहिलेला आहे असे समजतात. म्हणजे परमार्थात गुरू करणे किंवा न करणे असा विकल्प असूच शकत नाही

नाथपंथात गुरूला ईश्वराहूनही श्रेष्ठ दर्जाचे स्थान आहे. नाथयोग्यांनी शिवाला आदिगुरू मानले असून विष्णुरूपी मत्स्येंद्र याला त्याचा पहिला शिष्य ठरवले आहे. नाथपंथात पितृवंश न सांगता गुरुवंश सांगण्याचा प्रघात आहे. ज्ञानेश्वर महाराज 'मी विठ्ठलपंतांचा' असं कुठेच सांगत नाहीत. पण 'ज्ञानदेव म्हणे निवृत्तीचा' असं मात्र

विश्वास मागून मिळत नसतो. तो कमवावा लागतो.

वारंवार सांगतात. नाथ असोत वा सिद्ध असोत, सर्वांनीच गुरूची आवश्यकता अपरिहार्यपणे मानली आहे. श्रीरामकृष्ण परमहंसांनी आपले सर्व आध्यात्मिक धन विवेकानंदांना केवळ त्यांच्या मस्तकावर हात ठेवून दिले. निवृत्तिनाथांनी मस्तकी हात ठेवला आणि ज्ञानेश्वर गीतार्थाचे प्रवक्ते झाले. या गोष्टी तर्काने आणि बुद्धीधने जाणण्याजोग्या नाहीत. या अंधकारमय जगात जो दिव्य प्रकाश झिरपतो तो अशा गुरूंच्या द्वारेच होय! म्हणूनच ब्रह्मज्ञान देणारा सद्गुरू हा सर्वश्रेष्ठ असल्याचे रामदासांनी म्हटले आहे.

भारतीय शिक्षणपद्धतीत गुरूला असाधारण महत्त्व दिलेले आहे. गुरू म्हणजे वेदशास्त्रांचे अध्यापन करणारा या अर्थी पाणिनीने आचार्य, प्रवक्ता, श्रोत्रिय व अध्यापक असे ४ प्रकारचे गुरू सांगितले आहेत. उपनीत बटूला वेदाचे अध्यापन करणारा तो आचार्य. ब्राह्मणे, श्रोतसूत्रे व वेदांग यांचे सार्थ अध्यापन करणारा तो प्रवक्ता, शिष्यांना वेदाची संथा देणारा तो श्रोत्रिय व कृत अर्थात वैज्ञानिक वा लौकिक साहित्याचे अध्यापन करणारा तो अध्यापक होय.

गुरू ही केवळ व्यक्ती नसून ती एक शक्ती आहे जी भविष्याच्या युक्ती सांगते असं म्हटलं तर वावगं ठरू नये. कारण प्रतयेक मनुष्याला या ना त्या रूपात ही गुरुशक्ती प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष मार्गदर्शन करतच असते. कोणी तिला देव मानतं तर कोणी संत.

अशाच देवत्वाचा आणि संतत्वाचा सुरेख संयम पाहायला मिळतो तो वज्रेश्वरी आणि गणेशपुरी या तीर्थक्षेत्री. आज कित्येक शतके आपल्या भक्तांच्या हाकेला धावून प्रसंगी वज्रासारखी अभेद्य कवच होऊन त्यांचं रक्षण करणारी माता ही सर्व भक्तांना गुरुस्थानीच आहे. तानसा नदीच्या तीरावर एका टेकडीवर वास करणारी ही देवी पुराणकथेनुसार इंद्राने वसिष्ठांवर फेकलेले वज्र गिळणारी म्हणून 'वज्रेश्वरी' या नावाने पूजिली गेली. याचाच अर्थ असा की पुराणकाळापासून या आदिशक्तीनं हे 'गुरूत्व' धारण केलं आहे आणि म्हणूनच आजही देवीच्या त्या रूपात, येणारा भक्त त्या आश्वासक गुरूरूपालाच पाहत असतो.

या देवत्वासोबतच तिथे वास्तव्य आहे ते 'संत नित्यानंद बाबा' यांचं. कलियुगात म्हणजे आताच्या २१ व्या शतकात मानव-अवतार धारण करून भक्ताला 'श्रमाच्याच मार्गाने जा' असा मार्ग दाखवणारे आधुनिक संत. निर्मोही, मितभाषी, वंदनीय, आदरणीय, महनीय, अनिर्वचनीय, अवर्णनीय असे हे संतगुरू.

नित्यानंद बाबांना लहान मुले फार आवडायची त्यांच्या उपलब्ध छायाचित्रांचा अभ्यास केल्यास लक्षात येते की लहान मुलांमध्ये बाबा मिसळून, हास्यविनोद करताना दिसून येतात. कदाचित त्या बालमूर्तीतच ते परमेश्वर पाहायचे आणि आपल्याला संदेश द्यायचे की असंच 'निज शैशवास जपा' अर्थात लहान मुलांसारखं निष्कपटी, निरागस व निष्पाप असा म्हणजे हे जग आणखी सुंदर होईल. त्यांना गुरुस्थानी मानणारे अनेक शिष्य - ज्यांत हॉटेल व्यवसायात अग्रेसर शेट्टी समाजाचा अधिक समावेश आहे - गुरुपौर्णिमेला न चुकता दर्शनास येतात. कारण त्यांची अशी श्रद्धा असते की भविष्यात येणाऱ्या प्रत्येक संकटातून आपली सुटका हेच आशीर्वाद देणारे हात करणार आहेत.

म्हणूनच म्हणावंसं वाटतं...

गुरू म्हणजे अक्षरे दोन
परि अमृताचा समुद्र जाण...
ॐ गुरवे नमः।

**सौ. साधना कारंडे-जोशी**
साहा. शिक्षिका,
डॉ. बेडेकर विद्या मंदिर (मा. वि.), ठाणे

•••

# परिसर वार्ता

**- संकलित**

## डॉ. बेडेकर विद्या मंदिर, पूर्व प्राथमिक विभाग

सन २०१४-१५ या शैक्षणिक वर्षात ७७६ विद्यार्थी शिकत होते. वार्षिक परीक्षेचा निकाल १००% लागला असून श्रेणी प्राप्त केली आहे व शासनाच्या आर. टी. ई. नियमानुसार शाळेने शाळासमृद्धीची दहा मानके पूर्ण करून 'अ' श्रेणी प्राप्त केली आहे.

| इयत्ता | एकूण विद्यार्थी | अ श्रेणी प्राप्त विद्यार्थी | ब श्रेणी प्राप्त विद्यार्थी | क श्रेणी प्राप्त विद्यार्थी | ड श्रेणी प्राप्त विद्यार्थी |
|---|---|---|---|---|---|
| इ. १ ली | १४६ | ८६ | ५८ | २ | -- |
| इ. २ री | १७२ | १२२ | ४४ | ६ | -- |
| इ. ३ री | २४५ | १८१ | ६२ | २ | -- |
| इ. ४ थी | २१२ | १४७ | ५८ | ७ | -- |

### नवागतांचे स्वागत

सोमवार दि. १५ जून २०१५ रोजी इयत्ता पहिलीतील नवोदित विद्यार्थ्यांचे गोळ्या वाटून स्वागत करण्यात आले. तसेच सर्वशिक्षा अभियान अंतर्गत शासनाकडून आलेल्या मोफत पाठ्यपुस्तकांचे वाटप व्यवस्थापन समिती अध्यक्षा सौ. स्नेहल कुबल, उपाध्यक्ष श्री. आनंद मालुसरे व मुख्याध्यापिका सौ. विजया भंडारेबाई, ज्येष्ठ शिक्षिका सौ. घोरपडे, सौ. रजपूत, सौ. फिरके यांच्या हस्ते इ. १ ली ते इ. ४ थी च्या विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तके वाटप करण्यात आली.



**सर्वशिक्षा अभियान अंतर्गत मोफत पाठ्यपुस्तकांचे वाटप करताना व्यवस्थापन समिती अध्यक्षा सौ. स्नेहल कुबल, उपाध्यक्ष श्री. आनंद मालुसरे व मुख्याध्यापिका सौ. भंडारे**

### पालकसभा

शनिवार दि. २७ जून २०१५ रोजी पालक-शिक्षक संघाची व माता-पालक संघाची स्थापना पालक सभेत मतदान पद्धतीने करण्यात आली.

### आंतरराष्ट्रीय योगदिन

मा. पंतप्रधान मोदीजी यांच्या सूचनेनुसार २१ जून २०१५ हा दिवस संयुक्त राष्ट्र संघाने 'आंतरराष्ट्रीय योगदिन' म्हणून घोषित केल्यामुळे या दिनाचे औचित्य साधून आमच्या शाळेच्या प्रांगणात हा दिवस साजरा करण्यात आला. ह्या कार्यक्रमासाठी शाळेचे सर्व कर्मचारी, विद्यार्थी, विद्यार्थिनी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. योगाचे प्रशिक्षण घेतलेल्या सौ. मोहितेबाई यांनी



**रविवार दि. २१ जून २०१५ रोजी योगदिन साजरा करण्यात आला. प्रात्यक्षिक करताना शिक्षक-विद्यार्थी-पालक**

सर्वांकडून प्रार्थना, ध्यानस्थिती, नमस्कार मुद्रा, शिथिलीकरण व इतर आसने करून घेतली व रोज योगा करण्याचा संकल्प करून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

हमें हमारे मनको हमेशा संतुलित रखना है।
इसीमेंही हमारा आत्मविश्वास समाया हुआ है।

### इयत्ता ३ री एम.टी. एस. परीक्षा

१८ जानेवारी २०१५ रोजी घेण्यात आलेल्या इयत्ता ३ रीच्या एम.टी.एस. परीक्षेस ५८ विद्यार्थी बसले होते. परीक्षेचा निकाल ९०.७०% लागला असून ठाणे केंद्रात आदित्य निलेश साजेकर याने तिसरा क्रमांक मिळवून शिष्यवृत्ती प्राप्त केली आहे. ठाणे केंद्रात निहाल चंद्रकांत घोगावले यान चौथा क्रमांक मिळवून शिष्यवृत्ती प्राप्त केली आहे. या परीक्षेस इयत्ता ३ रीच्या सौ. घोरपडे, सौ. कुडव, सौ. बागवाले, सौ. भांगरे, सौ. मोहितेबाई व मुख्याध्यापिका सौ. भंडारेबाई यांनी मार्गदर्शन केले आहे.

### इयत्ता ४ थी शिष्यवृत्ती परीक्षा

मार्च २०१५ मध्ये घेण्यात आलेल्या पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेस इयत्ता ४ थीचे ६० विद्यार्थी बसले होते. निकाल १००% लागला असून कु. प्रथा दीपक मोरे राज्यात १७ वी व चिंतन पुराडकर राज्यात २६ वा आला असून या दोघांना शिष्यवृत्ती प्राप्त झाली आहे. या सर्व विद्यार्थ्यांना सौ. गोखले, सौ. राणे, सौ. अंबिके, सौ. ठाणेकर, सौ. गायकवाड व मुख्याध्यापिका सौ. भंडारेबाई यांनी मार्गदर्शन केले आहे.

### दिंडी

शुक्रवार दि. २४/६/२०१५ रोजी इयत्ता १ ली ते इ. ४ थीच्या विद्यार्थ्यांची आषाढी एकादशीनिमित्त दिंडी काढण्यात आली. दिंडीत विद्यार्थ्यांनी वारकऱ्यांचे व विठ्ठल-रखुमाईचे वेष परिधान केले होते. या निमित्ताने शिक्षकांनी विद्यार्थ्यांना या दिनाचे महत्त्व समजावून सांगितले व विठ्ठलनामाचा जयघोष करत भजने करण्यात आली. निरनिराळी गाणी सांगण्यात आली. त्यामुळे विद्यार्थी, शिक्षक पांडुरंगाच्या नामात दंग झाले होते. एक वेगळेच प्रसन्न वातावरण निर्माण झाले होते.

## डॉ. बेडेकर विद्या मंदिर, माध्यमिक विभाग

### ‘गुरुपौर्णिमा’ (सत्‌चित्‌आनंदाचा ॐकार)

शुक्रवार दि. ३१ जुलै रोजी डॉ. बेडेकर विद्या मंदिर, माध्यमिक विभागात इ. ७ वी साठी गुरुपौर्णिमेचा कार्यक्रम विद्यालंकार सभागृह येथे दुपारी ३ ते ४.३० या वेळात संपन्न झाला.

विद्यार्थी, शिक्षक, प्र. मुख्याध्यापक श्री. गढरी सर व प्रमुख पाहुण्या म्हणून सौ. सुमेधा विजय बेडेकर या उपस्थित होत्या.

‘गुरूपौर्णिमा’ या दिवसाचे महत्त्व विशद करताना त्यामागील वैज्ञानिक तत्त्वांचाही त्यांनी खुलासा केला. तसेच निसर्गाची सही म्हणजे ॐ व उत्पत्ती, स्थिती, लय यांचा संगम म्हणजे निसर्ग ॐ या रूपात आपल्याला भेटतो. निरनिराळ्या आकर्षक चित्रांचा वापर व त्यांचे विवेचन आणि सोबत सुरेल यथोचित गाण्यांची साथ यांमुळे त्यांचे मार्गदर्शन आणखीनच खुलले. ‘उत्तरोत्तर

प्रगती करू' या स्फूर्तिगीताने त्यांनी भाषणाची सांगता केली आणि विद्यार्थ्यांमध्ये नवचैतन्य निर्माण केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्र. मुख्याध्यापक श्री. गढरीसर व सूत्रसंचालन सौ. साधना कारंडे-जोशी यांनी केले.

**बक्षीस समारंभ**

सन २०१४-१५ या वर्षात रामबाग, भोर, पुणे येथे झालेल्या महाराष्ट्र राज्य स्काउट-गाइड राज्य पुरस्कार परीक्षेस आपल्या शाळेतील इ. ८ वी, ९ वी तील विद्यार्थी बसले होते व ते सर्व उत्तीर्ण झाले. त्यांना राज्यपालांच्या हस्ते प्रमाणपत्र व बॅज प्रदान करण्यात आले. हा समारंभ राजभवनात संपन्न झाला.

यशस्वी स्काउट-गाइडची नावे खालीलप्रमाणे -

गाइड :
१. ऋतुजा देवीदास जाधव
२. धनश्री दत्तात्रय शिंदे
३. मानसी दशरथ पावसकर
४. सृष्टी लक्ष्मण सिनलकर

स्काउट :
१. निनाद मदन आडके
२. रोहन प्रकाश साईल
३. विवेक बसवराज बन्ने
४. दिव्येश केदार बापट
५. शुभम् गणेश शिंदे
६. सिद्धान्त विवेक बस्ताव
७. चिन्मय मिलिंद धुरी
८. गौरव दीपक जाधव
९. ओमकार देवराम विधाटे
१०. अथर्व अभय शिंगे

मार्गदर्शक शिक्षक

गाइड कॅप्टन - सौ. कल्पना बोरवणकर

स्काउट मास्टर - श्री. प्रकाश पांचाळ

**कार्यशाळा**

हस्तकला विषयांतर्गत मूर्तिकामामध्ये इ. ७ वीच्या विद्यार्थ्यांनी दि. २३.७.२०१५ रोजी शाडू मातीपासून गणपतीच्या सुंदर, सुबक अशा मूर्ती तयार केल्या.

ही कार्यशाळा 'पर्यावरण दक्षता मंच' तर्फे आयोजित केली होती. कार्यशाळेत एकूण ५० विद्यार्थी सहभागी झाले होते.

या कार्यशाळेचे उद्घाटन शाळेचे प्र. मुख्याध्यापक श्री. गढरी यांच्या शुभहस्ते झाले. कार्यशाळेचे आयोजन व मार्गदर्शन हस्तकला शिक्षिका सौ. कल्पना बोरवणकर यांनी केले.

## बांदोडकर विज्ञान महाविद्यालय

**व्याख्यानमाला**

बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय व होप सामाजिक संस्था, ठाणे यांच्या संयुक्त विद्यमाने पर्यावरणविषयक व्याख्यानमालेचे आयोजन नोव्हेंबर २०१४ पासून सुरू केले आहे. आतापर्यंत ५ व्याख्याने संपन्न झाली. ही व्याख्याने सर्वांकरता निःशुल्क आहेत. बहुधा शनिवारी सायंकाळी ५ ते ७ या वेळेत आयोजित करण्यात येतात. ह्या वर्षी पुढील व्याख्यानांचे आयोजन करण्यात आले.

**१. "Small Wonders in Nature" (निसर्गातील चिमुकली आश्चर्ये)**

सध्या समाजामध्ये जंगल आणि वन्य जीव यांबाबत फारच आकर्षण निर्माण होऊ लागले आहे. आजकालच्या पिढीला राष्ट्रीय उद्याने, अभयारण्ये इत्यादी ठिकाणांना विरंगुळा म्हणून भेट देणे आवडू लागले आहे. उद्याने, अभयारण्ये म्हटले की डोळ्यांसमोर फक्त काही वन्य प्राणीच येतात. परंतु यांमध्येदेखील केवळ वन्य प्राण्यांव्यतिरिक्त छोटे छोटे पक्षी, प्राणी, कीटक आदींचा

व्यक्तिमत्त्व सुंदर नसेल तर दिसण्याला काहीच अर्थ नाही. कारण दिसण्यात अन् सुंदर असण्यात खूप फरक असतो. - स्वामी विवेकानंद

समावेश असतो. जैवसाखळीमध्ये हे छोटे छोटे प्राणी व कीटक महत्त्वाची भूमिका बजावत असतात.

या छोट्या वन्य जिवांबद्दल समाजामध्ये जागरूकता निर्माण करण्यासाठी **"Small Wonders in Nature"** ('निसर्गातील चिमुकली आश्चर्ये') या विषयावर श्री. युवराज गुर्जर यांचे व्याख्यान दि.१३ जून २०१५ रोजी बांदोडकर विज्ञान महाविद्यालयातील पतंजली सभागृहात सायंकाळी ५.०० वाजता आयोजित करण्यात आले होते. श्री. युवराज गुर्जर हे मुक्त छायाचित्रकार व खरे निसर्गप्रेमी आहेत. गेली २० वर्षे त्यांनी अनेक अभयारण्ये, राष्ट्रीय उद्याने इत्यादींना भेट देऊन काढलेली विविध वन्य जिवांची छायाचित्रे त्यांच्या संग्रही आहेत. या व्याख्यानाला ५० हून अधिक जण उपस्थित होते.

### २. Lecture on "Principles and Wildlife Management"

समाजामध्ये वन्य जीव व्यवस्थापन याबद्दल प्रबोधन होण्याच्या हेतूने "Principles and Wildlife Management" या विषयावर डॉ. शशिकुमार मेनन, संचालक TDM लॅबोरेटरी यांचे व्याख्यान दि.१८ जुलै २०१५ रोजी बांदोडकर विज्ञान महाविद्यालयातील पतंजली सभागृहात सायंकाळी ५.०० वाजता आयोजित करण्यात आले होते.

### ३. भारतातील फुलपाखरांची विविधता

फुलपाखरे ही त्यांच्या आकर्षक रंगसंगतीमुळे आपल्या आवडत्या कीटकांमध्ये गणली जातात. फुलपाखरांच्या जगभरात जवळजवळ १५००० प्रजाती आढळतात. भारतात वैविध्यपूर्ण हवामानामुळे फुलपाखरांच्या जवळजवळ १५०० प्रजाती पश्चिम घाट, भारतातील उपखंड आणि हिमालयीन प्रदेशात आढळतात. त्यांच्या नैसर्गिक अधिवासातील सूक्ष्म बदल ही अतिशय संवेदनशील बाब असल्याने फुलपाखरे ही संवर्धनाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची जैवनिर्देशक प्रजाती मानली जाते.

निसर्गातील या अतिशय सुंदर जिवांविषयीची माहिती लोकांपर्यंत पोहोचविण्याच्या हेतूने 'भारतातील फुलपाखरांची विविधता' या विषयावर श्री. आयझॅक किहीमकर, डेप्युटी डायरेक्टर, BNHS यांचे व्याख्यान दि.२५ जुलै २०१५ रोजी बांदोडकर विज्ञान महाविद्यालयातील पतंजली सभागृहात सायंकाळी ५.०० वाजता संपन्न झाले.

### शिक्षकांचे अभिनंदन

रसायनशास्त्र विभागातील प्रा. प्रकाश माळी यांचा विविध कार्यक्रमांमध्ये सहभाग होता व त्यांना अनेक पुरस्कारही मिळाले. ते पुढीलप्रमाणे -

- दि.०२ मे २०१५ रोजी मा. शिक्षण उपसंचालक, मुंबई विभाग, मुंबई यांनी नामनिर्देशित राज्य पुरस्कार प्राप्त प्रतिनिधी सदस्य म्हणून प्रा. माळी सरांची उच्च माध्यमिक शाळा मूल्यांकन समिती सदस्य या पदावर निवड केली.
- National/International Human Rights Orgn. या संस्थेने "Public Relation Officer, Maharashtra State" या पदावर एका वर्षासाठी (१.५.२०१५ ते ३०.४.२०१६) नेमणूक केली.
- दि.२५ जाने.२०१५ रोजी राष्ट्रीय मतदार दिवस कार्यक्रमानिमित्त आयोजित वक्तृत्व, निबंध, रांगोळी, चित्रकला, पथनाट्य, वादविवाद स्पर्धेत सहभागाबद्दल प्रशस्तिपत्रक देण्यात आले.
- दि.१६ जुलै २०१५ रोजी बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय, ठाणे यांनी आयोजित केलेल्या "Exploring New Horizons of Teaching - Learning Methodologies" या परिषदेमध्ये भाग घेतला.
- दि.१८ जुलै २०१५ रोजी जय महाराष्ट्र पत्रकार वृत्तपत्रलेखक व कवी महासंघ आयोजित महाराष्ट्र जन गौरव पुरस्कार २०१५ प्रदान करण्यात आला.

---

जुलूम सहन करणे म्हणजे सोशिकपणा नव्हे, परमार्थही नव्हे, ती केवळ लाचारी आहे.

- २६ जुलै २०१५ रोजी "Thane Creek Convention " आयोजित "The event in partnership with the Mangrove Cell supported under the Indo-German Biodiversity Programme's Coastal and Marine Protected Areas Project" या चर्चासत्रामध्ये सहभाग घेतला.
- दि. ५ जून २०१५ रोजी श्री. चित्तरंजन शरद थत्ते यांनी "Study of Heterogeneous Catalysis in Organic Synthesis" या विषयावर प्राध्यापक डॉ.एम.व्ही.रत्नम यांच्या मार्गदर्शनाखाली मुंबई विद्यापीठामध्ये संशोधन पेपर सादर केला.
- दि.२१ जुलै २०१५ रोजी श्री. वरद रवींद्र प्रधान यांनी "Development of Stereoisomeric LC-MS Method and its Application in Bio-Availability and Bio-Equivalence Studies" या विषयावर प्राध्यापक डॉ.एम.व्ही.रत्नम यांच्या मार्गदर्शनाखाली मुंबई विद्यापीठामध्ये संशोधन पेपर सादर केला.

**यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ बी.लिब., एम.लिब. आणि वृत्तपत्रविद्या व जनसंज्ञापन पदविका अभ्यासक्रम निकाल २०१४-१५**

| इयत्ता | प्रथम वर्ग प्रथम श्रेणी | प्रथम श्रेणी प्राप्त विद्यार्थी | द्वितीय श्रेणी प्राप्त विद्यार्थी | तृतीय श्रेणी प्राप्त विद्यार्थी | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| ग्रंथालय आणि माहितीशास्त्र पदवी शिक्षणक्रम (B.LIB.) | ०२ | १६ | ०३ | १५ | ५८.३३ |
| ग्रंथालय आणि माहितीशास्त्र निष्णात शिक्षणक्रम (M.LIB.) | ०१ | ११ | ०१ | ०९ | ५९.०९ |
| वृत्तपत्रविद्या व जनसंज्ञापन पदविका (DCJ) | ०१ | ०५ | ०३ | ०१ | ९० |

**प्रत्येक शाखेतील पहिले तीन विद्यार्थी**

| ग्रंथालय आणि माहितीशास्त्र पदवी शिक्षणक्रम (B.LIB.) | ग्रंथालय आणि माहितीशास्त्र निष्णात शिक्षणक्रम (M.LIB.) | वृत्तपत्रविद्या व जनसंज्ञापन पदविका (DCJ) |
|---|---|---|
| दाबेकर मंगेश (७१.३%) | मस्के वैशाली (७१%) | रणशूर राजन (७१.५० %) |
| जाधव धीरज (७०.१ %) | कानविंदे अंकिता (६६.५०%) | खंबे संतोष (६७%) |
| घंगाळे सतीश (६९.१ %) | ढेपे प्राजक्ता (६६.२५ %) | पुणेकर संदेश (६३.७५ %) |

आईसाठी कोणतीही गोष्ट सोडा; पण कोणत्याही गोष्टीसाठी आईला सोडू नका.

## तंत्रनिकेतन

### ISTE श्रीनिवास रामानुजन गणित स्पर्धा २०१४-१५

१२ डिसेंबर २०१४ रोजी वि. प्र. मंडळाच्या तंत्रनिकेतनमध्ये ISTE-Student चॅप्टरतर्फे राष्ट्रीय स्तरावरील गणित स्पर्धा घेण्यात आली होती. सदर स्पर्धा विद्यार्थी आणि शिक्षकांसाठी होती.

प्रा. सुजाता गुप्ते, प्रा. फातिमा रिजवी, प्रा. अमिशा मिस्त्री ह्या शिक्षकांनी तर कु. गौरव कदम (TYIE), कुमारी रिचा यादव (TYCO) आणि इप्सिसाम चौधरी (SYCO) ह्या विद्यार्थ्यांनी भाग घेतला होता. या सर्वांनी या गणित स्पर्धेत घवघवीत यश प्राप्त केले. ही परीक्षा तिन्ही स्तरावर घेण्यात आली होती. त्याचा तपशील खालीलप्रमाणे -

| स्पर्धकाचे नाव | स्तर | क्रमांक |
|---|---|---|
| १. प्रा. सुजाता गुप्ते (शिक्षक) | चॅप्टर<br>स्टेट<br>राष्ट्रीय | प्रथम<br>दुसरा<br>तिसरा |
| २. प्रा. फातिमा रिजवी (शिक्षक) | चॅप्टर<br>स्टेट<br>राष्ट्रीय | दुसरा<br>पहिला<br>चौथा |
| ३. प्रा. अमिशा मिस्त्री (शिक्षक) | चॅप्टर<br>स्टेट | तिसरा<br>दुसरा |
| ४. कु. गौरव कदम (TYIE) (विद्यार्थी) | चॅप्टर<br>स्टेट | तिसरा<br>पहिला |
| ५. कु. रिचा यादव (TYCO) (विद्यार्थिनी) | चॅप्टर | पहिला |
| ६. इप्सिसाम चौधरी (SYCO) (विद्यार्थी) | चॅप्टर | दुसरा |

दि. ४ जुलै २०१५ रोजी वरील स्पर्धकांचा श्री मलकुळा वीणयागार इंजीनिअरिंग कॉलेज, पाँडेचेरी येथे मान्यवरांच्या शुभहस्ते रोख पारितोषिक आणि मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. त्यांच्या यशाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

### ISTE श्रीनिवास रामानुजन गणित स्पर्धा २०१४-१५ परीक्षेत प्रा. सुजाता गुप्ते यांचा रोख पारितोषिक व मानचिन्ह देऊन सन्मान...



प्रा. सुजाता गुप्ते विद्या प्रसारक मंडळाच्या तंत्रनिकेतन, ठाणे येथे गणित विषयाच्या अध्यापक म्हणून कार्यरत आहेत. दि. १२ डिसेंबर २०१४ रोजी तंत्रनिकेतनमध्ये घेण्यात आलेल्या ISTE श्रीनिवास रामानुजन गणित स्पर्धा २०१४-१५ परीक्षेत त्या सहभागी झाल्या होत्या. सदर परीक्षेमध्ये त्यांना चॅप्टर स्तरावर प्रथम, प्रादेशिक (Zonal) स्तरावर दुसरा आणि राष्ट्रीय स्तरावर तिसरा क्रमांक मिळाला. तिन्ही स्तरांवर त्यांनी चांगले यश प्राप्त केले आहे.

सदर स्पर्धा परीक्षा उत्तर्ण झालेल्या प्रा. सुजाता गुप्ते यांचा ४ जुलै २०१५ रोजी श्री मलकुळा वीणायागर इंजीनिअरिंग कॉलेज, पाँडेचेरी येथे रोख पारितोषक आणि मानचिन्ह देऊन मान्यवरांच्या शुभहस्ते गौरव करण्यात आला.

राष्ट्रीय स्तरावर गणित स्पर्धा ही ISTE-Student चॅप्टरद्वारे आयोजित करण्यात आली होती. देशभरातील अनेक स्पर्धकांनी ही परीक्षा दिली होती. अशा या राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धा परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या प्रा. गुप्ते ह्या अत्यंत विद्यार्थिप्रिय आणि शिस्तप्रिय म्हणून ओळखल्या जातात. गणित विषयात त्यांचा चांगलाच हातखंडा आहे. त्यांना प्राप्त झालेल्या यशामुळे पुन्हा एकदा विद्या प्रसारक मंडळाचे तंत्रनिकेतन हे राष्ट्रीय स्तरावर अधोरेखित झाल्याचे दिसून येते. त्यांच्या ह्या यशाबद्दल तंत्रनिकेतन आणि विविध स्तरांतून अभिनंदन करण्यात येत आहे.

### 'Electro - Vision 2015' एक दिवसीय चर्चासत्र

विद्या प्रसारक मंडळाच्या तंत्रनिकेतनच्या इलेक्ट्रिल पॉवर सिस्टिम विभागातर्फे 'Electro - Vision 2015'

अंतर्गत एकदिवसीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. सदर चर्चासत्र हे दि. १७.०७.२०१५ या दिवशी सकाळी ९.०० ते ४.४५ या वेळेत कात्यायन हॉल, ठाणे कॉलेज कॅम्पस येथे पार पडले.

अभियांत्रिकीच्या प्रमुख विषयाची ओळख, चांगले तंत्रज्ञ आणि नागरिक बनविणे शिवाय बाहेरच्या स्पर्धेत टिकतील असे विद्यार्थी तयार करणे हा ह्या चर्चासत्राचा प्रमुख उद्देश होता.

सदर कार्यक्रमासाठी डॉ. मनजीत सिंग (हेल्थ केअर प्रोफेशनल), डॉ. दीपा राठी (लाइफ सायन्सेस इन्स्टिट्यूट) श्री. भारत कदम (असिस्टंट इंजीनिअर, डेप्युटी क्वालिटी मॅनेजर फॉर NABL) आणि सौ. रूपाली शहा (एच आर डायरेक्टर, शहा टेक्निकल कलस्टंट प्रा. लि.) इत्यादी प्रमुख पाहुणे म्हणून हजर होते.

चर्चासत्रात इलेक्ट्रिकल पॉवर सिस्टिम विभागाच्या द्वितीय आणि तृतीय वर्षाचे विद्यार्थी सहभागी होते.

प्रथम डॉ. मनजीत सिंग यांच्या शुभहस्ते चर्चासत्राचे उद्घाटन करण्यात आले. प्राचार्य दि. कृ. नायक आणि EPS विभाग प्रमुख प्रा. सौ. एन. व्ही. वडेर उपस्थित होते. श्री. मनजीत सिंग यांनी उपस्थितांना आपल्या भाषणात प्रत्येकाने जीवनात चांगल्या नीतीचे आचरण केले पाहिजे, असे सांगितल- नेटक्या आणि चांगल्या आयोजनाबद्दल आणि मनजीत सिंग यांच्या उत्स्फूर्त भाषणाबद्दल प्राचार्य दि. कृ. नायक यांनी प्रसंशा केली.

सदरचा कार्यक्रम हा चार सत्रांमध्ये विभागला होता.

प्रथम सत्र - औद्योगिक सुरक्षितता आणि प्रथमोपचार (10.00 a.m. to 11.30 a.m.)

प्रथम सत्राची सुरुवात सकाळी १०.०० वा. झाली. डॉ. मनजीत सिंग यांनी प्रार्थनेचे महत्त्व याविषयी माहिती दिली. आपल्या गुरुजनांबद्दल आदर, दुसऱ्याविषयीची आस्था आणि वेळेच नियोजन इत्यादींवर त्यांनी भर दिला. औद्योगिक सुरक्षितता आणि प्रथमोपचार यांविषयी प्रात्याक्षिकासह माहिती दिली. प्रथमोपचाराद्वारे दुसऱ्यास कशी मदत करावी हे प्रात्यक्षिकासह करुन दाखविले. डॉ. मनजीत सिंगच्या या सत्राने सर्वच प्रेरित झाले.

द्वितीय सत्र - प्रत्येकामध्ये ऊर्जा असते. (11.45 a.m. to 1.45 p.m.)

डॉ. दीपा राठी ह्या या सत्राच्या प्रमुख होत्या. त्यांनी उपस्थितांना प्रत्येक व्यक्तीमध्ये काहीना काही ऊर्जा असते. त्या ऊर्जेला ओळखून तिचा विकास केला पाहिजे असे सांगितले. कोणती बलस्थाने आणि उणिवा आहेत याचा शोध घेणे आवश्यक आहे. प्राप्त परिस्थितीला कसे समोर जाता येईल याचे मार्गदर्शन त्यांनी उपस्थितांना दिले.

तृतीय सत्र - पॉवर सिस्टिमचे तंत्र श्री. भारत कदम यांनी तृतीय सत्रात पॉवर सिस्टिमसंबंधी माहिती दिली. विजेचे रूपांतरण आणि बदल, वीजचोरी आणि त्यास प्रतिबंध, मीटरिंग, स्काडा (SCADA), पीएलसी (PLC) आणि यांत्रिकीकरण इत्यादीविषयीची माहिती उपस्थितांना करून दिली. त्यांनी स्मार्ट ग्रीडसंबंधी माहितीवर विशेष भर दिला.

सत्र चौथे : तंत्र मुलाखतीचे (3.30 p.m. to 4.45 p.m.)

चौथे सत्र हे मुलाखती तंत्रासंबंधीचे होते. सौ. रूपाली शहा यांनी मुलाखतीला कसे सामोरे जावे ह्याविषयी माहिती दिली. त्यांनी HR राउंडदरम्यान कोणकोणते प्रश्न विचारले जाण्याची शक्यता असते याची माहिती दिली. प्रश्नोत्तर सत्रात जवळजवळ सर्व विद्यार्थी सहभागी झाले होते. भावी आयुष्याच्या दृष्टीने या सत्राचा त्यांना चांगलाच उपयोग होईल हे नक्कीच. साद-प्रतिसादात्मक सत्र असल्यामुळे विद्यार्थ्यांचा फारच उत्साह होता.

सदर संपूर्ण चर्चासत्र यशस्वी होण्यासाठी प्राचार्य दि. कृ. नायक, विभाग प्रमुख सौ. एन. व्ही. वडेर आणि कार्यक्रम समन्वयक प्रा. सौ. एस. एस. कुलकर्णी यांनी प्रयत्न केले.

●●●

मनापासून आलेले हास्य माणसाच्या चेहऱ्यावर उगवत्या सूर्याची लाली प्रकट करते.

(पृष्ठ २ वरून - **संपादकीय)**

पाळावे लागणारे सर्व सामाजिक नियम सर्वच नागरिक पाळत असल्यामुळे, आपल्या कुटुंबाबरोबर आनंदी जीवन जगणे त्यांना सहज शक्य होत होते.

या सगळ्यांचा परिणाम असा होता की, ज्या क्षेत्रामध्ये त्यांचे 'कौशल्य' होते, तेथे अधिक काम किंवा संशोधन करून ते स्पर्धेमध्ये पुढे जाऊ शकत होते. नोकरी आणि दैनंदिन गरजा भागवता भागवता मेटाकुटीस आलेल्या भारतीय वस्तुस्थितीच्या बरोबर उलटी परिस्थिती तेथे होती. यामुळेच त्यांचा आत्मविश्वास आणि आत्मसन्मान वाढत होता. 'पात्रते'ला फळ मिळते हा अनुभव त्यांच्यातील सर्जनशीलतेला खतपाणी घालत होता.

याच वेळी भारतामध्ये मात्र 'गरिबी' हे भांडवल ठरत होते. 'आरक्षणा'च्या राजकारणातून जातिनिर्मूलन तर सोडाच, पण जातीयवाद, जातीय वैमनस्य हे भक्कम केले जात होते. हजारो वर्षांच्या अन्यायाच्या कथांना पारितोषिकांचा रतीब घातला जात होता. एकीकडे भारतात उद्योगधंद्यांमध्ये वाढ होत असल्याने नवश्रीमंत वर्गही उदयास येत होता. संगणक उद्योगाकरता अमेरिकेतील सिलिकॉन व्हॅली याच सुमाराला या तरुण भातीयांना आकर्षित करू लागली. व्यक्तिगत स्तरावर व्यवसाय सुरू करण्याकरता भारतामध्ये दिसणाऱ्या मनोवृत्तीच्या बरोबर विरुद्ध परिस्थिती सिलिकॉन व्हॅलीमध्ये होती. तेथील भारतीय, नवीन कल्पनांना जन्म देऊन नवीन उद्योग निर्माण करण्यामध्ये आघाडीवर दिसायला लागले. १९९९मध्ये ७% असलेल्या अशा भारतीय वंशाच्या उद्योगधंद्यांचे प्रमाण २०१२ मध्ये १५.५% झाले. नवकल्पनांवर आधारित असलेल्या व्यवसायांना भांडवल मिळणे भारतामध्ये आजही जवळजवळ अशक्यच, तर अमेरिकेत मात्र व्हेंचर कॅपिटालिस्टस् धोका पत्करूनही अशा उद्योगांना भांडवलाबरोबरच, व्यवस्थापन आणि विक्रीचे नियोजनही देत होते. याचाच फायदा अनेक भारतीय तरुणांनी उचलला. स्पर्धेमध्ये उद्योग टिकवायचा असेल तर तुम्हाला सातत्याने नवीन नवीन गोष्टी कराव्या लागतात. नवीन कल्पनांची निर्मिती ही 'खुल्या' वातावरणातच होते. वर उल्लेख केलेले अनेक संगणकउद्योग बाल्यावस्थेत असताना भारतीयांच्या कुशाग्र बुद्धीमुळे त्यांना सातत्याने नावीन्य टिकविता आले. हाच आत्मविश्वास घेऊन यातल्या ज्या भारतीयांनी चांगले अर्थार्जन केले, ते पुढे व्हेंचर कॅपिटॅलिस्ट झाले. त्यांनी त्यांच्या पुढच्या भारतीय वंशाच्या लोकांना मदत करून नावीन्याचे हे चक्र चालूच ठेवले.

सुंदर पिचाय ह्यांच्या व्यक्तिगत कौशल्याचा हा जेवढा सन्मान आहे, तेवढाच वर उल्लेख केलेल्या संशोधन, व्यवसायाकरता लागणारे भांडवल, आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे 'फक्त' आणि 'फक्त' पात्रतेलाच मिळणारे प्राधान्य, या वातावरणाचाही तो एक परिणाम आहे. सुंदर पिचाय किंवा सत्या नडेला यांचे 'वय' बघता, गुगल आणि मायक्रोसॉफ्टसारख्या महाकाय कंपन्यांनी त्यांच्यावर टाकलेला विश्वास बरेच काही सांगून जातो.

अमेरिकेतील या यशस्वी भारतीयांचे बहुतेक मूळ शिक्षण हे भारतातच झाले आहे. त्यांच्याबरोबरचे ८० ते ९० टक्के त्यांचे तेवढेच लायक सहकारी आज भारतात आहेत. भारततही अनेक उद्योगधंदे गेल्या पन्नास वर्षांत वाढले. फरक एवढाच आहे की ते सगळे, स्वस्त मनुष्यबळ या मूळ साधनावर उभे आहेत. त्यांचे तंत्रज्ञान उसने आहे. यांतील बहुतेक उद्योग हे 'सेवा' या वर्गात मोडणारे आहेत. परवाना राजच्या अडथळ्यांचे डोंगर ओलांडताना त्यांची दमछाक होते. बधिर बाबू आणि भ्रष्ट राजकीय व्यवस्थेतून त्यांची कार्यकुशलता आणि उत्साहाचे पानिपत झालेले असते. Ease of doing Business याचे वास्तव उद्योजकांकडून जे सांगितले जाते ते काही फारसे उत्साहवर्धक नाही. उद्योगधंद्यांना सहज आणि माफक व्याजदरांनी भांडवलाची उपलब्धता याचा भारतात आजही

पराभवाने माणूस संपत नाही, प्रयत्न सोडतो तेव्हा तो संपतो. कठीण काळात सतत स्वतःला सांगा की, ''शर्यत अजून संपली नाही कारण मी अजून जिंकलेलो नाही.''

अभावच आहे. या गोष्टी सुधारतील एवढीच सध्या आशा आहे. नवीन कल्पनेचा धागा घेऊन, धोका पत्करून, संगणकावर आधारित उद्योगांची सुरुवात आता कोठे भारतात होत आहे. यातही यांचे बहुतेक सगळे संस्थापक आणि त्यांना नव्यानव्याने सामील होत असलेल्या व्यक्तीसुद्धा मोठ्या प्रमाणावर आज अमेरिकेहून आयात कराव्या लागत आहेत. थोड्या प्रमाणात 'घरवापसी' असेच याला म्हणावे लागेल.

'पात्रते'वर आधारित पाश्चात्त्य देशांमधील शिक्षण, उद्योग, व्यवसायनीती आणि आजची भारतातील या क्षेत्रामधील प्रगती आणि वास्तव यांमध्ये जमीनअस्मानाचा फरक आहे. आजही आपली शिक्षणपद्धती 'आले मंत्र्याच्या मना' या सूत्रावरच चालू आहे. शिक्षणाकरता त्याच्या मूळ घटकांना 'किमान' स्वातंत्र्याची गरज असते. सरंजामशाही वृत्तीने पगारापासून अन्नापर्यंत आणि शैक्षणिक शुल्कापासून शिक्षकांच्या नियुक्तीपर्यंत नियंत्रणांचे जाळे, काय दर्जाचे शिक्षण निर्माण करते हे आपण बघतच आहोत. फुकटेपणा हा या सगळ्या व्यवसायाला लागलेला एक शापच नाही तर व्यसन आहे. चित्रपटशिक्षणाच्या संस्थांमधील नियुक्त्यांपासून साहित्य संस्कृतीमधील केल्या गेलेल्या नियुक्त्यांवरील 'वादळ' ही या परिस्थितीत काही बदल होईल असे अजिबात सुचवीत नाहीत. जर का या राज्यात किंवा देशात पात्रता ठरविण्याकरता आणि ती पडताळण्याकरता इतके नियम आणि समित्यांची गरज लागत असेल, तर यातच या पद्धतीच्या शोकांतिकेची बीजे आहेत. आपल्या विद्यापीठांमधून उच्चशिक्षणाकरता उपलब्ध असलेली साधने झपाट्याने कालबाह्य होत आहेत. साध्या परीक्षा आणि निकालही ते वेळेवर लावू शकत नाहीत. आयआयटीमध्येही आज पुरेसा प्रशिक्षित शिक्षकवर्ग उपलब्ध नाही. तीच परिस्थिती व्यवस्थापनाशी निगडित असलेल्या आयआयएमसारख्या संस्थांचीही आहे. ज्या या संस्थांनी भारतीय वंशाचे यशस्वी उद्योजक, संशोधक अमेरिकेला दिले त्या संस्थांनाही आज आपण राजकीय धोरणे आणि हस्तक्षेपापासून वाचवू शकत नाही. रोज नवीन धोरण, तर रोज नवीन 'फुकटे'पणाच्या खैराती. शिक्षणाचा 'साहसी' खेळच झालेला आज आपण बघतो आहोत. उच्चशिक्षण किंवा संशोधनाकरता सुसज्ज ग्रंथालये लागतात हे आपल्या गावीही नाही. पाठीवरचे ओझे लघुसंगणक म्हणजे टॅब देऊन कमी करता येते इतका मोठा 'विनोद' जगात कोठे सापडणार नाही.

सुंदर पिचाय यांनी आपला मार्ग निवडला, पण त्यांच्या भारतातल्या सहकाऱ्यांनी अजून किती वेळ वाट बघायची, 'मुक्त' आणि 'पात्रते'ला न्याय मिळेल असे 'वातावरण' (Ecosystem) निर्माण होण्याची?

**डॉ. विजय बेडेकर**

•••

## दिशासाठी

**आपले लेखनसहकार्य अपेक्षित आहे. आपल्या अध्ययन-अध्यापन विषयांतील नवीन घडामोडी, नवीन ज्ञानक्षेत्रे यांबाबत सातत्याने लेखन करणे हे अध्यापनात साहाय्यकारी ठरणारे आहे.**

**तरी, आपणांकडून लेखन अपेक्षित करीत आहोत.**

**- संपादक**

Posting under the Reg. No. MH/MR/TNC-27/2004-2006


# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

- *अत्याधुनिक दृक्‌श्राव्य यंत्रणा*
- *वातानुकूलित प्रसन्न वातावरण*
- *वाहने उभी करण्यासाठी प्रशस्त जागा*

*अशा सुविधांनी युक्त*

| सभागृहाचे नाव | ठिकाण | आसन क्षमता |
|---|---|---|
| थोरले बाजीराव पेशवे सभागृह | महाविद्यालय परिसर | ३०० |
| कात्यायन सभागृह | कला/वाणिज्य इमारत, ३ रा मजला | १६० |
| पातंजली सभागृह | बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय इमारत | १६० |
| पाणिनी सभागृह | डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था इमारत | १८० |
| मनु सभागृह | वि.प्र.मं.चे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय इमारत | २५० |

## ❋ संपर्क ❋

कार्यवाह

**विद्या प्रसारक मंडळ**

विष्णूनगर, नौपाडा, ठाणे – ४०० ६०२

दूरध्वनी क्रमांक – २५४२६२७०


हे मासिक प्रकाशक आणि संपादक डॉ. विजय वासुदेव बेडेकर व मुद्रक श्री. विलास सांगुर्डेकर, परफेक्ट प्रिण्टस्, नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे-४०० ६०१ या मुद्रणालयामध्ये छापून विद्या प्रसारक मंडळ, जिल्हा ठाणे-४०० ६०२ यांच्याकरिता विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, विष्णूनगर, ठाणे - ४०० ६०२ इथून प्रकाशित केले.